


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक २, मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पराभूत केल्याने लोणीवाल्यांची आता पॅकेजची गंमत!

## ■ खा. नीलेश लंके यांनी डॉ. सुजय विखे यांना पुन्हा डिवचले ■ वाळवणे येथे सुपा जिल्हा परिषद गटातील प्रचाराचा शुभारंभ ■ सुपा गटामध्ये सर्वाधिक मताधिक्य हवे, खा. लंके यांची अपेक्षा

वाळवणे : विशेष प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीमध्ये काही अपक्ष उमेदवारांनी प्रवरेचे टेंडर भरले आहे. लोकसभा निवडणूकीत आपण पराभूत केले म्हणून लोणीवाल्यांनी आता ही पॅकेजवर गंमत सुरू केली आहे. म्हणतात ना, सुंभ जळाला तरी पिळ जळत नाही अशी लोणीकरांची अवस्था झाली आहे. प्रमुख पक्षाच्या उमेदवाराने निवडणूक सोडली असल्याने आपल्याकडे विजयाची गॅरंटी आहे. त्यामुळे इकडे-तिकडे जाणारांनी आमच्याकडे यावे अशी साद खा. लंके यांनी घातली.**

महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ सुपा जिल्हा परिषद गटाच्या प्रचाराचा नारळ वाळवणे येथील श्री काळभैरवनाथांना अर्पण करण्यात आला. त्यानंतर झालेल्या सभेत खा. लंके हे बोलत होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, प्रत्येक गावात जास्तीत जास्त मताधिक्य मिळेल यासाठी प्रयत्न करा. घराघरात जाऊन प्रचार केला तर चांगले यश मिळाले. लोकसभा निवडणूक ही सराव परीक्षा होती, आता वार्षिक परीक्षा म्हणून विधानसभा निवडणूकीकडे पाहा. या निवडणूकीत सुपा गटात सर्वाधिक मताधिक्य मिळाले पाहिजे. कारण या गटापासून आपण आपल्या राजकीय प्रवासाला सुरूवात झाली आहे. गटामध्ये १४ ते १५ हजारांचे मताधिक्य मिळाले पाहिजे. लोकसभा निवडणूकीत १५ हजारांचे मताधिक्य निघोज गटाने दिले. तुम्हाला कमीपणा वाटत नाही का ? असा सवाल लंके यांनी केला.

**आजच्या अंकासोबत महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांची विशेष पुरवणी**

एकाच घरात दोन उमेदवारीचा आरोप करणारे कोरोना काळात कुठे होते ? असा सवाल करीत आपली लढत ज्या पक्षाच्या उमेदवाराशी आहे, त्या पक्षाने नादी लावण्यासाठी एकाला उमेदवारी दिली आहे. त्या उमेदवाराला गावे सापडेपर्यंत निवडणूक संपणार आहे. आजपर्यंत अनेक गावात उमेदवार पोहचलेही नाहीत. आम्ही प्रत्येक गावात तिनदा पोहचलो आहोत. निवडणूकीपुरते भुछत्राप्रमाणे उगवणारे, ऐनवेळी मतदारांसमोर जाणारे मतदार कधीही स्विकारत नसल्याचा घणाघात खा. लंके यांनी केला.

खा. लंके पुढे म्हणाले, महाविकास आघाडीने पंचसुत्री प्रसिध्द केली आहे. महिलांना तीन हजार रूपये, शेतकऱ्यांचे तीन लाख रूपयांपर्यंतो कर्ज माफ. नियमित कर्ज भरणाच्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहनपर मदत, सर्वांना २५ लाख रूपयांचे आरोग्य सुरक्षा कवच, बेरोजगारांसाठी चार हजार रूपये हा महाविकास आघाडीचा अजेंडा असल्याचे खा. लंके म्हणाले. यावेळी माधवराव लामखडे, वसंत ठोकळ,बाबाजी तरटे, युवराज गाडे, कारभारी पोटघन, सचिन पठारे, सुवर्णा धाडगे, प्रियंका खिलारी, सुरेखा पवार, पुनम मुंगसे, बापू शिर्के, सतिश भालेकर, सचिनशेठ पवार, राजेंद्र चौधरी, राजेश्वरी कोठावळे, भाऊसाहेब भोगाडे, जयसिंग मापारी, दत्ता दिवटे, कल्पना थोरात, सुनिता झावरे, अनिता भोगाडे, विजेता साबळे, माया साळवे, सुनिता चौगुले, जयश्री पठारे, राणी यादव, मनिषा जाधव यांच्यासह सुपा जिल्हा परिषद गटातील विविध गावांचे सरपंच, चेअरमन,महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



■ सुपा जिल्हा परिषद गटामध्ये राणी लंके यांच्या प्रचाराचा नारळ काळभैरवनाथांना वाहण्यात आल्यानंतर झालेल्या सभेमध्ये खा. नीलेश लंके व उमेदवारांनी उपस्थितांशी संवाद साधला.

### ५ वर्षात २ हजार कोटींची कामे

महायुती सरकारने जाती जातीमध्ये संघर्ष निर्माण केला. समाजात वितुष्ट निर्माण केले आहे, त्यामुळे या सरकारला जागा दाखविण्याची या निवडणूकीच्या निमित्ताने वेळ आली आहे. आपल्या मतदारसंघातील ३५० कोटींच्या कामांना स्थगिती देण्यात आली. आता विकास कामांत खोडा घालणारांना आपल्याला धडा शिकवावा लागेल. ५ वर्षात मी २ हजार कोटींची कामे मंजुर करून आणली. प्रलंबित प्रश्न पुढील काळात सोडविले जातील अशी ग्वाही लंके यांनी दिली.

### ३३ हजार रूग्णांना जिवदान

दोन वर्षे कोरोनात गेले. कोरोना काळात ३३ हजार रूग्णांना जीवदान दिले. भारतात असे कोव्हीड सेंटर नव्हते. संकटात आपण प्रत्येकासाठी धावून जाण्याचा प्रयत्न केल्याचे लंके म्हणाले.

### राणी लंके १ लाखांनी विजयी होणार

खरा शिवसैनिक असेल त्याने उध्दव ठाकरे यांना ज्या पध्दतीने बाहेर काढण्यात आले, ज्या शरद पवारांना या वयात दुख दिले, त्याचा बदला घेण्याची आता वेळ आली आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. आपल्या मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार किमान एक लाख मतांनी विजयी होणार असल्याची ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली.

### दलालांच्या नादी लागू नका !

गट तट करू नका, एकमेकांमध्ये स्पर्धा लावा. काही लोक लोकसभेला चुकले ते पुन्हा आले यात आनंद आहे. राज्यात सर्वाधिक मतांनी आपला उमेदवार विजयी झाला पाहिजे. भुछत्रांच्या नादी लागू नका. सुपा गटात एजंटगिरी करणारे पुढारी आहेत. त्यांचे डफडे आता बंद झाले आहे. दलाली करणारांच्या नादी लागू नका. दुसऱ्याच्या टाळूवरचे लोणी खाणारे या भागातील पुढारी असल्याचे सांगत खा. लंके यांनी सुपा गटातील विरोधकांवर शरसंधान केले.

### लोकसभा झाकी है !

लोकसभा झाकी है विधानसभा बाकी है ! आता त्याच ताकदीने तुम्ही ही निवडणूक लढवा. मी जळगावला होतो. तिथे माझ्या सभेची आवष्यकता होती. पारनेरची जागा विजयी होणार आहे याचा खात्री जळगांवकरांनाही आहे. त्यामुळे पारनेरला जाऊ नका अशी त्यांची मागणी होती. मात्र नीलेश लंके यांच्या प्रेमाखातर मी जळगावरून येथे आलोय असे प्रसिध्द व्याख्याते यशवंत गोसावी सांगितले.

### बैलाकडे पाहून सौदा करणार की मालकाकडे ?

पारनेर येथे सभेसाठी आलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शेतकऱ्याने कांद्याच्या प्रश्न विचारल्यावर तुला नीलेश लंकेने पाठविले काय ? अशी विचारणा अजित पवार यांनी केली होती. उमेदवार कोण आहे हे पाहू नका. माझ्याकडे पाहून मतदार करा असे आवाहन पवारांनी केले होते. शेतकरी बैल घेताना बैलाकडे पाहून घेणार की बैल विकणाराकडून ? असे सांगत गोसावी यांनी पवारांच्या वक्तव्याची खिल्ली उडविली.

### चांगले केले, चांगलेच होणार

कोरोना काळात लंके यांनी सेवा केली. चांगले पेरले म्हणून लंके यांचे चांगलेच होणार आहे. एकमेव आमदार व खासदार असा आहे त्याचा संपूर्ण महाराष्ट्र मतदारसंघ आहे. गावागावात या माणसाने काम उभे केले आहे. वंचितांना मदत करण्याचे काम केले आहे.

**यशवंत गोसावी**
प्रसिध्द व्याख्याते

### लंके दाम्पत्याकडे आत्मियता

प्रत्येक मतदारसंघात गेल्यानंतर उमेदवार लोकांना पैसे देताना पाहिले. इथे मतदार उमेदवारांना पैसे देताना दिसत आहेत. सामन्यांविषयी आत्मीयता लंके दाम्पत्याकडे आहे. म्हणून कुठेही न दिसणारे चित्र या मतदारसंघात दिसत असल्याचे यशवंत गोसावी यांनी सांगितले.

### राणी लंके यांची खंत

या गटाने, गणाने व गटाने मला पंचायत समिती, जिल्हा परीषदेच्या निवडणूकीत विजयी केले आहे. ही माझी कर्मभुमी आहे. विकास कामांसाठी खासदारांनी मोठा निधी दिला. तरीही लोकसभा निवडणूकीत कमी झालेल्या मतदानाबद्दल उमेदवार राणी लंके यांनी खंत व्यक्त केली. विकास कामात आम्ही कुठे कमी पडलो ? कोणाच्या सुख, दुःखात आम्ही सहभागी झालो नाही ? असे प्रश्न उपस्थित करत लंके यांनी मागिल निवडणूकीत झालेली चुक सुधारण्याचे आवाहन केले.

### त्यावेळी लाडकी बहिण आठवली नाही का ?

मणिपुरमध्ये महिलेची विवस्त्र धिंड काढली जाते. कर्नाटकातील उमेदवाराने अत्याचार केले त्याच्या प्रचाराला पंतप्रधान जातात. त्यावेळी तुम्हाला लाडकी बहिण आठवली नाही का ? उध्दव ठाकरे यांना अपमानास्पद पध्दतीने पदावरून दुर केले गेले त्याचा बदला घेण्याची वेळ आली आहे. मराठी माणसाने उभे केलेले दोन पक्ष फोडणारांना गाडल्याशिवाय मतदार शांत बसणार नाहीत. आमचं चिन्ह चोरले तुम्ही. तुमच्याकडे घडयाळ असले तरी वेळ आमची आहे. आम्ही योग्य वेळी आमचे मतदान करू.

**यशवंत गोसावी**
प्रसिध्द व्याख्याते

### राणीताईचे कर्तृत्व व्यक्तिमत्वातून दिसते

महिला आमदार ही भाग्याची गोष्ट. कोण म्हणते महिला कारभार करू शकत नाही ? छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी घडविले हा इतिहास आहे. कर्तृत्व स्वतःला सिध्द करावे लागते ते त्यांच्या व्यक्तिमत्वातून दिसते. त्यांनी स्वतःला सिध्द केले आहे. मला त्यांचा अभिमान वाटतो. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्व महिलांनी त्यांना विजयी करायचे आहे. आपल्या लेकी-बाळींच्या भवितव्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी उभे रहायचे आहे.

**प्रियंका खिलारी**
महिला आघाडी तालुकाध्यक्ष, शिवसेना

### शंभर लांडगे शिकार करू शकत नाहीत !

निष्ठा ही जिवंत राहते ता गद्दारी गाडावी लागते. शंभर लांडगे एकत्र आले तरी ते या एका वाघाची शिकार करू शकत नाहीत. असे सांगत लोकसभा निवडणूकीतील पराभवाचा वचपा काढण्यासाठी विखे-पवार हे लंके यांच्या विरोधात एकत्र आल्याच्या बातमीवर यशवंत गोसावी यांनी भाष्य केले.

### हक्काने लिड द्या, हक्काने कामे मागा

खासदारांनी मतदारसंघासाठी २ हजार कोटी रूपयांचा निधी दिलेला आहे. लोकसभा निवडणूकीत झालेली चुक सुधारून कोठेही गाफील न राहता प्रचारात सहभागी झाले पाहिजे. महिला आमदार होणार म्हणून महिलांनी प्रचारात सहभागी झाले पाहिजे. पुढील सहा दिवस प्रचाराचे आहेत. तुम्ही प्रचार करा. पुढील पाच वर्षे आम्ही दोघे तुमच्यासाठी २४ तास उपलब्ध असू. हक्काने लिड द्या व हक्काने विकास कामे मागा.

**राणी लंके**
महाविकास आघाडीच्या उमेदवार

### नगर तालुक्यातून ६० हजार मतदान

२५ ,३० वर्षापासून मी पंचायत समितीच्या माध्यमातून राजकारण करत आहे. त्यामुळे नगर तालुक्यातून कसे मताधिक्य मिळावायचे हे अम्हाला माहीती आहे. राणी लंके यांना नगर तालुक्यातून ६० हजार मते मिळतील. नगर तालुक्यातील उमेदवाराच्या जि प गटातील फक्त चार गावे या मतदारसंघात आहेत. पारनेर तालुक्यातून तुम्ही जास्त मताधिक्य द्या, उर्वरीत उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली पाहिजे असे काम करा.

**माधवराव लामखडे**
मा. जि. प. सदस्य

### कपाळला कपाळ घालून काय उपयोग !

राणी लंके या नगर तालुक्यातील आहेत. त्यांना नगर तालुक्यातून मताधिक्क्य देण्यासाठी आम्ही त्यांचे भाऊ खंबीर आहोत. नगर तालुक्यातील इतरांनी आमच्या बहिणीविषयी काही बोलू नये. कोणी कोणाच्या कपाळाला कपाळ घासून चालत नाही असा सल्ला नगर तालुक्यातील उमेदवाराला देतानाच आमची बहिण लक्ष्मीरूपाने पारनेर तालुक्यात आली आहे. तिची ओटी मतदानाने भरभरून भरा. आम्हीही निष्ठेने काम करणार आहोत.

**वसंत ठोकळ**
मा. सरपंच, कामरगांव

### इतरांच्या घरात किती पदे आहेत ?

कोणातेही सर्वेक्षण पाहिले तर राणी लंके याच मोठया आघाडीवर असल्याचा अहवाल पहावयास मिळतो. विरोधकांकडे एकच मुद्दा आहे की एका घरात दोन पदे आहेत. अजित पवार यांच्या घरात, एकनाथ शिंदे यांच्या घरात, राधाकृष्ण विखे यांच्या घरात किती पदे आहेत ? त्यावेळी त्यांनी हा मुददा पुढे का आणला नाही ? नगर शहराच्या आमदारांच्या घरात किती पदे आहेत ? याचे उत्तर विरोधकांनी द्यावे, नंतर लंके परिवारावर बोलावे. महाविकास आघाडी राणी लंके यांच्या पाठीशी खंबिरपणे उभी आहे.

**योगीराज गाडे**
मा. नगरसेवक, नगर

### कर्नाटकात लंके यांचे फॅन, मला मोठे मतदान

निपाणी मतदारसंघात नीलेश लंके यांचे मोठे फॅन आहेत. लंके कुटूंबाला जनसेवेचा, लोककल्याणाचा वसा लाभलेला आहे. मी कर्नाटकात विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून उभा होते. नीलेश लंके यांनी माझ्यासाठी सभा घेतल्यानंतर मला मोठे मतदान झाले. पक्षाची ताकद कमी असतानाही लंके यांच्या सभेमुळे मला मते मिळाली.

**उत्तम पाटील**
बेळगांव, कर्नाटक

### झाशीच्या राणीला मतदान करा

खा. नीलेश लंके यांच्या कामाला साजेसे काम राणी लंके या करत आहेत. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची वाटचाल सुरू आहे. मतपत्रिकेमध्ये एकच झाशीची राणी असून त्यांनाच सर्वांनी मतदान करायचे आहे.

**सुवर्णा धाडगे**
महिला आघाडी तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस



# प्रगतीमंत्र

## व्यवसायाला कुटुंबाचा विरोध पण मुलीने जिद्दीने उभारली 1300 कोटींची कंपनी!



**एखादा व्यवसाय सुरू करणं अनेकदा जिकरीचं ठरतं. तो व्यवसाय चालेल का ? यासह व्यवसाय सुरू करण्यासाठी कुटुंबियांचा पाठिंबा असणं अत्यंत महत्त्वाचं, गरजेचं ठरतं. पण अशी एक महिला उद्योजिका आहे, जिच्या व्यवसायाला आज देशभरात तुफान प्रतिसाद मिळतो आहे. पण तिने व्यवसाय सुरू करण्याबाबत तिच्या कुटुंबात सांगितलं, त्यावेळी तिला कुटुंबाचा कोणताही पाठिंबा मिळाला नव्हता. पण तिने हिमतीने, जिद्दीने, स्वतःच्या मेहनतीने व्यवसाय सुरू केला आणि त्याला ग्राहकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. आज ही महिला उद्योजिका कोट्यवधींच्या संपत्तीची मालकीण आहे.**

### कोण आहे कोट्यधीश व्यवसायिका ?

रिचा कर यांनी कुटुंबाचा पाठिंबा नसताना अंतर्वस्त्रांची विक्री करणारी ऑनलाईन व्यवसाय सुरू केला आणि आज त्या कोट्यवधींची कमाई करत आहेत. त्यांच्या कंपनीने १३०० कोटींचा व्यवसाय उभा केला आहे. रिचा कर यांनी महिला आणि मुलींना दुकानात जाऊन अंतर्वस्त्र घेण्यासाठी अडचणी येतात हे ओळखलं. त्या स्वतः महिला म्हणून अंतर्वस्त्रांची खरेदी करताना दुकानात एखादा पुरुष विक्रेता असल्यास खरेदी करणं काहीसं सहज वाटत नसल्याचं जाणलं होतं. त्यामुळेच त्यांनी या समस्या लक्षात घेत अंतर्वस्त्रांचा ऑनलाईन व्यवसाय सुरू करण्याचं ठरवलं. अंतर्वस्त्रांची विक्री करण्यासाठी त्यांनी ऑनलाईन प्लॅटफॉर्म तयार केला आणि त्याला झिवामे असं नाव दिलं. दीड हजारातून सुरू केलेला व्यवसाय १० हजारांवर पोहोचला.

### विरोध पत्करून, जिद्दीने सुरू केला व्यवसाय

रिचा कर यांच्यासाठी हा व्यवसाय करणं सोपं नव्हतं. कुटुंबियांकडून त्यांना मोठा विरोध पत्करावा लागला. कुटुंबातील सदस्यांना त्यांनी हा व्यवसाय नेमका कसला आहे ? काय आहे ? याबाबत सांगितलं त्यावेळी हा व्यवसाय न करण्याचा सल्ला त्यांना मिळाला. त्यांच्या आईने त्यांना मी माझ्या मैत्रिणींमध्ये कसं सांगू की माझी मुलगी अंतर्वस्त्रांचा व्यवसाय करते, असं म्हणत विरोध केला. त्यांच्या मित्रमंडळींमध्येही अंतर्वस्त्रांच्या व्यवसायबाबत खिल्ली उडवली गेली होती. पण तरीही त्यांनी हार न मानता जिद्दीने या व्यवसायाची योजना आखली आणि व्यवसाय सुरू केला. या व्यवसायासाठी त्यांनी त्यांची नोकरीही सोडली.

### १३०० कोटींचं साम्राज्य उभारलं

जमशेदपूरमध्ये १९८० मध्ये जन्मलेल्या रिचा कर यांनी पदवीचं शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर त्या बंगळुरूमध्ये एका कंपनीत नोकरी करू लागल्या. याच दरम्यान त्यांना



अंतर्वस्त्रांच्या व्यवसायाची कल्पना सुचली होती. त्यानंतर त्यांनी नोकरी सोडली आणि पूर्णवेळ व्यवसायासाठी दिला. व्यवसायासाठी पैसे नसल्याने त्यांनी आपल्या संपूर्ण सेव्हिंगसह, कुटुंबातील सदस्यांकडून आणि काही मित्रांकडून पैसे घेतले आणि व्यवसाय सुरू केला. २०११ मध्ये ३५ लाखातून त्यांनी झिवामे नावाने अंतर्वस्त्रांचा व्यवसाय सुरू केला. व्यवसाय सुरू झाला आणि हळूहळू महिलांमध्ये याची मोठी चर्चा होऊ लागली. अनेक महिला अंतर्वस्त्र खरेदी झिवामेवरुन खरेदी करू लागल्या. ३५ लाखांतून सुरू झालेला व्यवसाय त्यांनी १३०० कोटींपर्यंत पोहोचवला. २०१४ मध्ये रिचा कर यांचं नाव फॉर्चुन इंडियाच्या अंडर-४० यादीमध्ये आलं होतं.

## महिलांसाठी अर्धवेळ व्यवसाय कल्पना!

**सध्याच्या युगामध्ये महिला या प्रत्येत क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. घर, कुटुंब आणि मुलं यांची जबाबदारी सांभाळत असतानाच नोकरी किंवा व्यवसाय करण्याची जिद्द आणि बळ महिलांच्या अंगी पाहायला मिळते.**



स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी अनेक मुली किंवा महिला धडपड करताना दिसतात. मात्र अनेकदा कमी शिक्षण किंवा कुटुंबाचा आणि मुलांचा भार किंवा इतर अनेक कारणांमुळे महिलाना नोकरी किंवा व्यवसायासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. अशा वेळी एखादा पार्ट टाइम बिझनेस हा चांगला पर्याय ठरू शकतो. पार्ट टाइम बिझनेस करायचा म्हटलं तर नेमका कोणता बिझनेस करावा आणि कसा करावा हा अनेक महिलांना प्रश्न पडत असेल. यासाठी आम्ही तुम्हाला काही बिझनेस आइडिया सांगणार आहोत. हे बिझनेस तुम्ही तुमच्या सोयीनुसार करू शकता. शिवाय कालांतराने ते वाढवत नेऊन तुम्ही तुमचं उत्पन्न वाढवू शकता. बिझनेस किंवा व्यवसाय करायचा म्हटलं तर भांडवल हवं. अनेक महिलांपुढे भांडवल हा देखील एक मोठा प्रश्न असतो. मात्र आम्ही तुम्हाला अगदी कमी भांडवल गुंतवून सुरु होणारे व्यवसाय तसंच भांडवल उभं करण्यासाठीचे पर्यायही सांगणार आहोत.

- यूट्यूब चॅनल : सध्याच्या घडीला अत्यंत ट्रेंडमध्ये असलेला हा व्यवसाय म्हणता येईल. कमी शिक्षण किंवा कोणत्याही भांडवलाशिवाय महिला यूट्यूब चॅनल सुरू करू शकतात. अनेक महिलांना स्वयंपाक, शिवणकाम, बेकिंग, सजावट किंवा येत असलेली कोणतीही कला दाखवणारं यूट्यूब चॅनल तुम्ही सुरू करू शकता. अर्थात प्रत्येक व्यवसायात संयम हा गरजेचा असतो. त्याच प्रमाणे यूट्यूब चॅनल सुरू केल्यानंतरही तुम्हाला सबस्क्रायबर आणि व्ह्यूज मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल. मात्र कालांतराने फालोअर्सच्या संख्येत वाढ झाल्याने तुम्हाला जाहिराती मिळून तुमची कमाई सुरू होऊ शकते.
- आल्ट्रेशन : अलिकडे रेडिमेड कपड्यांनी मोठी पसंती दिली जाते. शिवणकाम किंवा कपडे म्हणजेच ड्रेस, ब्लाउज शिवण्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो. मात्र तुम्ही आल्ट्रेशनचा व्यवसाय करू शकता. रेडिमेड ड्रेस किंवा इतर कपडे अल्टर म्हणजेच योग्य मापाचे करून देणं, तसेच तयार कपड्यांना डबल शिलाई मारून देणं, हे काम कमी वेळत होणारं असून यातून चांगली कमाई होवू शकते. यासाठी तुम्ही तुमच्या परिसरातील काही ड्रेस विक्रेते किंवा इतर कपड्यांच्या दुकानदारांशी संपर्क साधून ग्राहकांना तुमचं नाव सुचवण्याची विनंती करू शकता.
- बेकिंग : पार्ट टाइम व्यवसायामध्ये बेकिंग हा देखील एक चांगला पर्याय आहे. अलिकडे सेलिब्रेशन म्हटलं तर केक हवाच असतो. यासाठी तुम्ही घरी कस्टमाइज केकची ऑर्डर घेऊ शकता. केकसोबतच तुम्ही वेगवेगळ्या कुकिजही बेक करू शकता. व्हाट्सअप ग्रुप्स किंवा फेसबुक आणि इन्स्टाग्रामच्या मदतीने तुम्ही ग्राहक वाढवू शकता.
- डे केअर : जर तुम्ही एक गृहिणी आणि आई आहात तर तुमच्या साठी डे केअर सुरू करणं हा देखील एक चांगला पर्याय ठरू शकतो. जर तुमच्या घरात पुरेशी जागा असेल तर तुम्ही तुमच्या सोयीनुसार २-३ मुलांसाठी देखील डे केअर सुरू करू शकता. नोकरी करणाऱ्या अनेक महिला आपल्या मुलांसाठी उत्तम पाळणाघर शोधत असतात. जर तुम्ही पाळणाघरासाठी तुमच्या घरात उत्तम वातावरण तयार केलं आणि विश्वास संपादन केला तर यातूनही तुम्ही चांगली कमाई करू शकता.
- ब्युटी पार्लर : तुम्हाल शक्य झाल्यास एखादा ब्युटी पार्लरचा कोर्स करून तुम्ही घरच्या घरी ब्युटी पार्लर सुरू करू शकता. हेअर कटपासून ते मेकअप आणि फेशियल अशा विविध सेवा देणं तुम्ही सुरू केल्यास आपोआप महिला तुमच्या होम पार्लरमध्ये येऊ लागतील. घरात पार्लर सुरू करण्यासाठी तुम्ही सुरुवातीला अगदी कमी गुंतवणूक करू शकता. कालांतराने तुम्ही हा बिझनेस वाढवू शकता. अशा प्रकारे अगदी कमी शिक्षण आणि कमी पैशातही तुम्ही हे व्यवसाय सुरू करू शकता. त्याचप्रमाणे जर एखाद्या विषयाचे म्हणजेच पेंटिंग, कुकिंग, बेकिंग, शिवणकाम असे क्लासेसही घेऊ शकता.



### होममेड फूड

होम मेड फूडमध्ये वेगवेगळी गटवारी करता येईल. यात सगळ्यात पहिला पर्याय म्हणजे तुम्ही टिफिन सर्विसेस सुरू करू शकता किंवा मेस सुरू करू शकता. जर तुमच्या परिसरात कुटुंबापासून दूर राहणारे विद्यार्थी किंवा नोकरदार राहत असतील तर हा बिझनेस चांगला चालू शकतो. त्याच प्रमाणे तुम्ही होममेड स्नॅक्स तयार करून ते पॅकिंग करून विकू शकता. अलिकडे अनेकजण हेल्दी खाण्याकडे लक्ष देऊ लागले आहेत. यामध्ये तुम्ही काही पौष्टिक लाडू किंवा विविध कुकिज किंवा चिवडा असे पदार्थ तयार करून विकू शकता. आणखी पर्याय म्हणजे तुम्ही केवळ नाश्त्याचे पदार्थ देखील विकू शकता. अलिकडे वेळेच्या अभावी अनेकांना घरामध्ये नाश्ता करणं शक्य होत नाही. यासाठी तुम्ही केवळ नाश्त्याचे डबे पुरवू शकता किंवा तुमच्या जवळील एखाद्या दुकानदाराशी चर्चा करून कमिशनवर आधारित डील करून इडली चटणी, थेपले, समोसे अशा पदार्थांची पाकिट काउंटरवर विक्रीसाठी देऊ शकता. अलिकडे इन्स्टाग्राम, फेसबुक तसेच व्हॉटस्अप ग्रुप यामुळे मार्केटिंगचा मार्ग अगदी सोपा झाला आहे. सोशल मीडियाच्या मदतीने तुम्ही तुमच्या बिझनेसबद्दल प्रचार करू शकता.

## ४ लाख रुपयांमध्ये सुरू करा ‘हा’ व्यवसाय

**जर तुम्हाला नोकरीचा कंटाळा आला असेल आणि तुम्हाला एखादा व्यवसाय सुरू करायचा असेल तर आज आम्ही तुमच्यासाठी पुन्हा एक नवीन व्यवसाय कल्पना घेऊन आलो आहोत. हा असा व्यवसाय आहे ज्याच्या उत्पादनाची मागणी प्रत्येक वर्गातील लोकांमध्ये आहे. गाव असो वा शहर, या उत्पादनाला प्रचंड मागणी आहे. आम्ही साबण उत्पादनाबद्दल बोलत आहोत. या व्यवसायात मशिनच्या साहाय्याने साबण तयार करून ते बाजारात पोहोचवले जातात...**

आजच्या काळात साबणाची मागणी लहान शहरांपासून मोठी शहरे ते ग्रामीण भागातही आहे. त्यामुळे साबण बनवण्याचा व्यवसाय तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो. अगदी कमी पैशात तुम्ही साबण कारखाना उघडू शकता. हा व्यवसाय सुरू करण्यासाठी तुम्ही मोदी सरकारच्या मुद्रा योजनेअंतर्गत ८० टक्के कर्ज घेऊ शकता. मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज घेण्याचे अनेक फायदे आहेत.



- कोणत्याही बँकेतून कर्ज मिळेल : साबण उत्पादन युनिट उभारण्यासाठी एकूण १५,३०,००० रुपये खर्च येतो. यामध्ये युनिटचे स्थान, यंत्रसामग्री, तीन महिन्यांचे खेळते भांडवल यांचा समावेश आहे. या १५.३० लाख रुपयांपैकी तुम्हाला फक्त ३.८२ लाख रुपये खर्च करावे लागतील. उर्वरित रक्कम तुम्ही मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज म्हणून घेऊ शकता.
- आपण किती कमवाल? : केंद्र सरकारच्या मुद्रा योजना प्रकल्प प्रोफाइलनुसार, तुम्ही एका वर्षात एकूण सुमारे ४ लाख किलो उत्पादन करू शकाल. त्याची एकूण किंमत सुमारे ४७ लाख रुपये असेल. व्यवसायातील सर्व खर्च आणि इतर देवाण-घेवाण पूर्ण केल्यानंतर, तुमचा निव्वळ नफा ६ लाख रुपये असेल म्हणजे दरमहा ५०,००० रुपये.
- भारतातील साबण बाजार श्रेणी : साबण बाजार त्याच्या वापराच्या आधारावर वेगवेगळ्या श्रेणींमध्ये विभागला जाऊ शकतो. जसे, लाँड्री साबण, सौंदर्य साबण, औषधी साबण, किचन साबण, सुगंधी साबण. मागणी आणि बाजारपेठ लक्षात घेऊन तुम्ही तुमची उत्पादने यापैकी कोणत्याही श्रेणीनुसार तयार करू शकता.

## महाराष्ट्रात ‘हे’ उद्योग सुरू करण्यास उत्तम वाव

**महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र हे कृषिप्रधान राज्य आहे. उत्पादन, बाजारपेठ, कच्चा माल येथे सहज उपलब्ध होऊ शकतो. राज्याच्या सर्वांगीण विकासात उद्योग व्यवसायांचा मोठा वाटा आहे असे नक्कीच म्हणता येईल. तुम्हालाही महाराष्ट्रात एक उद्योजक म्हणून स्वतःच्या पायावर उभे राहायचे असेल तर कोणत्या उद्योगांना सध्या अधिक स्कोप मिळू शकतो; भविष्यात कोणते उद्योग तुम्हाला यशस्वी उद्योजक बनवू शकतात तसेच महाराष्ट्रात कोणते उद्योग सुरू करण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे, हे जाणून घेऊया...**



- स्पिरुलिना फार्मिंग : कोणत्याही देशाच्या नागरिकांसाठी हेल्थ सेक्टर खूप महत्त्वाचे असते. कोविडनंतर तर या गोष्टीवर चांगलाच शिक्कामोर्तब झाला आहे. हेल्थ सेक्टर कधीही संपुष्टात येणार नाही हे तर आपण सगळेच जाणतो. त्यामुळे हेल्थ सेक्टरशी संबंधित व्यवसायात गुंतवणूक करणे अधिक फायद्याचे राहील. स्पिरुलिना ही एक अशी वनस्पती आहे, ज्यामध्ये नैसर्गिक प्रोटीन भरपूर प्रमाणात आढळते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी अनेक औषधांमध्ये या वनस्पतीचा वापर केला जातो. विशेष म्हणजे याच्या मॅन्युफॅक्चरिंगसाठी फार पैसे गुंतवावे लागत नाहीत. कष्टाने आणि जिद्दीने जर या व्यवसायाकडे लक्ष दिले तर भविष्यात स्पिरुलिना फार्मिंग तुम्हाला करोडपती बनवू शकते, असेही तज्ञ सांगतात.
- सर्जिकल कॉटन : महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होते. या कापसावर प्रक्रिया करून सर्जिकल कॉटन बनवला जाऊ शकतो. रुग्णालये, नर्सिंग होम, ब्युटी पार्लर्स अशा ठिकाणी सर्जिकल कॉटन मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. शेतकऱ्यांकडून कच्चामाल घेऊन त्यावर योग्य ती प्रक्रिया करून आपण सर्जिकल कॉटन व्यवसाय सुरू करू शकतो. यासाठी कापसावर ब्लिचिंग, ड्रॉइंग, लॅपिंग, रोलिंग, कटिंग आणि पॅकिंग या प्रक्रिया केल्या जातात. या व्यवसायासाठी मुबलक जागा आणि २५ ते ३० लाख रुपये भांडवल असणे आवश्यक आहे.
- कपड्यांचा व्यवसाय : महाराष्ट्रात बऱ्याच वेगवेगळ्या संस्कृतीचे लोक पाहायला मिळतात. तसेच बऱ्याच ठिकाणी पाश्चात्य आणि भारतीय संस्कृतीचे एकत्रिकरणही दिसून येते. त्यामुळे कपडे खरेदीकडे लोकांचा अधिक कल असतो. सोलापूर, मालेगाव, उल्हासनगर, भिवंडी या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात टेक्सटाईलचे कारखाने आहेत. इथून तुम्ही थेट माल घेऊन विकू शकता. त्यामुळे टेक्सटाईलमध्ये रिटेल, होलसेल, वेस्टर्न कपड्यांचे दुकान, ट्रेडिशनल कपड्यांचे दुकान सुरू करण्याचा विचार करायला हरकत नाही.
- व्हेजिटेबल डीहायड्रेशन : भारतातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भाज्या आणि फळांचे उत्पादन घेतले जाते. परंतु भाजीपाल्याला आवश्यक तो भाव मिळत नाही. अशावेळी भाजीपाला वाया घालवण्यापेक्षा त्यावर प्रक्रिया केल्यास यातून एक नवा व्यवसाय उभा राहू शकतो. तो म्हणजे व्हेजिटेबल डिहायड्रेशन उद्योग. यामध्ये भाज्या आणि फळे सुकवून त्यांची दीर्घकाळ टिकेल आणि स्वयंपाकात वापरता येईल अशी पावडर तयार केली जाते. हा उद्योग उभा करण्यासाठी कमीत कमी एक लाख रुपयांची गुंतवणूक करावी लागेल.
- मसाला उद्योग : भारतात पूर्वीपासूनच स्वयंपाकात मसाल्यांचा वापर केला जातो. त्यामुळे विविध प्रकारच्या मसाल्यांना बाजारपेठेत कायमच विशेष मागणी असते. हा उद्योग आपण घरगुती स्तरावरील सुरू करू शकतो. मोठ्या स्तरावर हा व्यवसाय उभा करायचा असेल तर तुम्हाला सुरुवातीला १० ते १२ कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासेल.




- पोहा मिल उद्योग : भारतीय अन्नपदार्थात पोह्याला एक महत्वाचे स्थान आहे. पोहे निर्मिती उद्योगासाठी जास्त मनुष्यबळ आवश्यक नसते. आपण अगदी ३ ते ४ कामगारांवर देखील उत्तमरित्या हा व्यवसाय उभा करू शकतो. या व्यवसायासाठी कच्चा माल म्हणून साळ वापरली जाते. साळ खरेदी करताना ती पोसलेली व व्यवस्थित स्वच्छ केलेली असावी. या उद्योगासाठी किमान १००० चौरस फुट जागेची आवश्यकता असते. छोट्या स्तरावर व्यवसाय सुरू करायचा असल्यास रोस्टर, भट्टी, वजन काटा, पोहयाचे यंत्र, चाळण्या; तर मोठ्या स्वरूपात सुरू करायचा असल्यास ग्रेडर, रोस्टर, डीस्टोनर, फ्लेकर, मिल, पोहा मिल, ग्रेडिंग मशीन, पॅकेजिंग मशीन यांसारख्या मशिनरींची आवश्यकता असते.

## शॉर्ट न्यूज

### चोरट्यांनी ओरबाडले महिलांचे दागिने

**जामखेड :** तालुक्यातील खामगाव येथील वाघमोडे वस्ती येथे चार चोरट्यांनी आश्रू नामदेव वाघमोडे यांच्या घरावर मोठाले दगड घालून दरवाजा तोडून घरातील महिलांच्या गळ्यातील २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ओरबाडले तसेच वाघमोडे यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला करून त्यांना जखमी केले. याचवेळी चोरट्यांनी शेजारील घरातूनही तीन ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केले. शनिवारी पहाटे ही घटना घडली. याप्रकरणी विष्णू आश्रू वाघमोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### माळी समाज आ. काळेंच्या पाठीशी

**कोपरगाव :** माजी खासदार शंकरराव काळे तसेच माजी आमदार अशोकराव काळे यांनी माळी समाजाला भरीव सहकार्य केलेले आहे. समाजाच्या माळी बोर्डीगसाठी काळे परिवाराने मदत केलेली होती. तोच आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आ. आशुतोष काळे हे देखील माळी समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. इतर समाजाने आ. काळे यांना पाठिंबा दिलेला आहे. त्याप्रमाणे येथील माळी समाजाने देखील आ. काळे यांच्या पाठिशी राहण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती कोपरगाव नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे यांनी दिली.

### युती सरकारची कामे शेतकरी हिताचीच

**पाथर्डी :** उद्धव ठाकरे यांच्या काळात झालेली सरकारची ठोस कामे सांगा, महायुतीच्या काळात झालेली कामे पाहा. दोन्ही सरकारच्या कामाची तुलना शेतकऱ्यांनी करावी. मागेल त्याला सौरपंप, शेती पंपाची वीजबिल माफी, शेतकऱ्यांना एक रुपयात विमा, लाडकी बहींण योजना, शेतकरी सन्मान योजना ही महायुती सरकारची काने शेतकरी हिताचीच आहेत. त्यामुळे राज्यातही महायुतीचे सरकार आणण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांना पुन्हा विधानसभेत पाठवा, असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केले.

### संदेश कार्ले यांना शेतकरी संघटनेचा पाठींबा

**नगर :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरी झाल्याने पारनेर विधानसभा मतदारसंघातील लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. त्यातच महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले यांनी अपक्ष विधानसभेच्या रिंगणात उडी मारल्याने निवडणूक रंगतदार झाली आहे. त्यातच कार्ले यांना शेतकरी संघटनेने पाठिंबा जाहीर केला असून कार्ले यांच्या प्रचारात सक्रिय होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### विरोधकांशी सेटलमेंट केली नसल्याचा दावा

**नेवासा :** आपण विरोधकांबरोबर कसलीही सेटलमेंट केलेली नाही असा दावा माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांनी शनीदेवाच्या डोक्यावर हात ठेवून केल्यानंतर ऋषिकेष शेटे यांच्या नेतृत्वात लंघे समर्थकांनी शनीच्या साक्षीनेच त्यांच्यावर पुन्हा विरोधकांशी हातमिळवणीचे आरोप केले. सेटलमेंटच्या आरोपांवरून सुरू झालेले राजकीय घमासाने शनी देवाच्या साक्षीने पुन्हा तीव्र झाले. निवडणूक प्रचार शिंगेला पोहचला असताना आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. माजी आ. मुरकुटे यांच्यावर भाजपा कार्यकर्त्यांकडून सेटलमेंट केल्याचे जाहीर आरोप सोशल मीडियाच्या माध्यमातून करण्यात आले होते.

# भाजपा कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

## ■ शिवाजी कर्डिले यांना धक्का ■ आ. प्राजक्त तनपुरे यांनी केले स्वागत

**राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार प्राजक्त तनपुरे यांनी प्रचारात आघाडी घेतलेली असतानाचा आता भाजपाचे कार्यकर्तेही त्यांच्या गोटात सहभागी होऊ लागले आहेत. महायुतीचे उमेदवार मा. आ. शिवाजी कर्डिले यांना हा धक्का मानला जात आहे. पक्षामध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे आ. प्राजक्त तनपुरे यांनी स्वागत केले.**

गेल्या पाच वर्षात या मतदार संघाचे लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना आ. प्राजक्त तनपुरे यांनी विकास कामांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांच्या मनामध्ये आदराचे स्थान मिळविले आहे. त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्वाची भुरळ तरूणाईला पडत असून मतदारसंघातील तरूणांचा ओढा राष्ट्रवादी काँग्रेसकडे होताना दिसत आहे.

राहुरी तालुक्यातील गुहा तसेच कानडगांव येथील अनेक भाजपा कार्यकर्त्यांनी आ. प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करीत महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार केला. या कार्यकर्त्यांच्या या प्रवेशामुळे भाजपासह महायुतीचे उमेदवार मा. आ. शिवाजी कर्डिले यांना धक्का मानला जात आहे.



■ गुहा, कानडगांव, देसवंडी येथील तरूणांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

### कानडगांव परिसरात तनपुरेंची ताकद वाढली

कानडगांव येथील विशाल लोंढे, लक्ष्मण संसारे, महेश लोंढे, बाबासाहेब लोंढे, मारुती लोंढे, गणेश लोंढे, सुधाकर लोंढे, आकाश संसारे, किसन गांगुर्डे, सागर बर्डे, सावळेराम गागरे, सिताराम महाराज, सुनील लोंढे, सुभाष लोंढे, संजय बर्डे, गोरख संसारे, दिलीप लोंढे, मच्छिंद्र लोंढे, दत्तात्रय लोंढे यांनी देखील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केल्याने आता या परिसरात आमदार तनपुरे यांची ताकद वाढली असल्याचे बोलले जात आहे.

### शरद कोळसेंच्या हाती तुतारी

गुहा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन शरद गोरक्षनाथ कोळसे यांनी भाजपाला रामराम ठोकत हाती तुतारी घेतली आहे. त्यांच्या प्रवेशाप्रसंगी कुरणवाडी योजनेचे अध्यक्ष रघुनाथ मुसमाडे, प्रेरणा मल्टीस्टेटचे चेअरमन सुजित वाबळे, बापूसाहेब कोबरणे, डॉ. रविंद्र गागरे, सोपान हिरगळ, मंजाबापू कोबरणे, नंदकुमार तनपुरे हे उपस्थित होते.

### देसवंडीतील युवकांची विकासाला साथ

देसवंडी येथील तरूणांनीही आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या कामावर प्रभावित होऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मा. नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे यांच्या उपस्थितीत या युवकांचा प्रवेश केला. तुषार कोकाटे, सौरभ तमनर, किशोर शिरसाट, इरफान पठाण, नितिन बोर्डे, सुमित माने, अमोल तमनर, अविनाश शिसाट, बब्बु पठाण, विकास शिरसाट, बाबासाहेब कोकाटे, नितीन कोकाटे, भाऊराव तमनर, सिध्दार्थ ताठे, सौरभ शिरसाट, श्रीकांत साठे, अजय बोर्डे, विकी बोर्डे, सतीश शिरसाट,अजय कोकाटे, अनिकेत शिरसाट, गणेश चव्हाण, निखिल बोर्डे, राहुल पेंढारे, तेजस शिरसाट आदी तरूणांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राहुरी तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी तरुणांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. राहुरी तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी सुसंस्कृत उच्चशिक्षिक उमेदवाराच्या पाठीशी तरूणांची फौज उभी करू असे उपसरपंच प्रवीण शिरसाट यांनी सांगितले.

## तरुणाच्या खून प्रकरणातील दुसरा आरोपीही जेरबंद

### पोहेगाव शिवारात ताब्यात घेवून अटक

**राहाता : प्रतिनिधी**

**दारू पिण्यासाठी पाण्याची बाटली दिली नाही म्हणून राहात्यातील ४२ वर्षाय तरूण गणेश कसाब याचा खून करणाऱ्या दुसऱ्या आरोपीला राहाता पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी दिली. मंगळवारी (ता.५) रात्री नगरपरिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलात राहाता येथील गणेश भाऊसाहेब कसाब या तरुणाला मारहाण करून त्याचा गळा आवळून खून केल्याची घटना घडली होती.**



घटना घडल्यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे व स्थानिक गुन्हा शखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी मोठ्या शिताफीने या गुन्ह्यातील आरोपी अनिल विश्वनाथ मोरे याला निफाड तालुक्यातील डोंगरगाव शिवारात ताब्यात घेऊन अटक केली होती. सदर आरोपींनी गुन्हा केला असल्याची कबुली देत दारू पिण्यासाठी पाण्याची बाटली दिली नाही म्हणून मी व माझा मित्र किरण रामदास वाघ असे आम्ही दोघांनी गणेश कसाब याचा खून केल्याची कबुली दिल्यानंतर राहाता पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, श्रीरामपूर अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबरमे शिर्डी पोलीस उपाधीक्षक शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी दुसऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरून या गुन्ह्यातील दुसरा आरोपी किरण रामदास वाघ याला कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव शिवारात ताब्यात घेऊन अटक केली असून त्याने देखील हा गुन्हा केला असल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.

या आरोपीला शोधण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी, किरण साळुंखे, बाबासाहेब काकड, सहायक फौजदार प्रभाकर शिरसाठ, पोलीस कॉन्स्टेबल झिने , पंढोरे, अनारसे गोपीनीय शाखेचे विनोद गंभीरे व आदी पोलीस कर्मचारी यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

**वाचकांच्या लेखणीतून**

## व्यक्ती छोटी; कीर्ती मोठी : ठकसेन बाबुराव हरेल



निघोज येथील सामाजिक व्यक्तीमत्त्व ठकसेन बाबुराव हरेल (७५) यांचे गेल्या ८ नोव्हेंबर रोजी निधन झाले. पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य आणि प्रसिद्ध फोटोग्राफर जयसिंग हरेल यांचे ते वडील होते.

आपल्या भागात कांदा हे नकदी पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या कांद्याची साठवण, सुरक्षितता आणि संरक्षण करण्यासाठी कांदा चाळींची आवश्यकता असते. अशा कांदा चाळी तयार करण्यात ठकसेन हरेल यांचा पंचक्रोशीत नावलौकिक होता.

मयताच्या अंत्यविधीची तयारी करणे किंवा करून देणे हे काहींच्या मते एक तुच्छ आणि नगण्य काम असते. पण ते कुणी तरी केलेच पाहिजे. कारण त्यापाठी उच्च सामाजिक तत्त्व असते. श्रेष्ठ सामाजिक पुण्य असते. ठकसेन हरेल यास मुक्तपणे हातभार लावीत. मार्गदर्शनही करीत. छोट्या छोट्या गोष्टींमध्येही मोठा आशय असतो, असे म्हणतात.

तसे काही वेळा नगण्य व्यक्तींच्या समाजकार्यातसुध्दा घनगंभीर अर्थ असतो. अशा व्यक्तींचे मोल आपल्याला समजले पाहिजे. ठकसेन बाबुराव हरेल हेही असेच भाविक व्यक्तीमत्व होते. त्यांना मनोभावे श्रध्दांजली.

नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.

## सकल मातंग समाजाचा राणी लंके यांना पाठिंबा

### खा. नीलेश लंके यांच्या कामावर प्रेरीत होऊन घेतला निर्णय

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर-नगर मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांना सकल मातंग समाजाच्या वतीने रविवारी जाहिर पाठिंबा देण्यात आला. खा. नीलेश लंके यांच्या विकास व सामाजिक कामांवर प्रेरीत होउन आम्ही हा निर्णय घेतल्याचे समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.**

सकल मातंग समाजाचे पारनेर तालुकाध्यक्ष रामदास साळवे,अण्णाभाऊ साठे स्मारक समितीचे तालुकाध्यक्ष नामदेवराव चांदणे, रामदास वायदंडे, मनेष वैराळ, राजू वैराळ, महादू मेंगाळ, बहुजन संघटनेचे संभाजीराव गायकवाड, राजू मेंगाळ, गेणभाऊ मेंगाळ, महादू शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

यासंदर्भात सकल मातंग समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, खासदार नीलेश लंके यांनी सामाजिक तसेच विकासाची मोठी कामे केली असून २४ तास ३६५ दिवस उपलब्ध असणारे लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचा नावलौकीक आहे. कोरोना संकटात अवघे जग भितीच्या सावटाखाली असताना खा. नीलेश लंके यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता हजारो रूग्णांना मोफत औषधोपचार दिले. त्यांचा आधार दिल्याने एकाही रूग्णाचा त्यांच्या शरदचंद्र पवार आरोग्य मंदिरात मृत्यू झाला नाही. कोरोना रूग्णांसाठी देवदूत ठरलेल्या खा. लंके यांनी त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरीकासाठी आरोग्यासह त्यांच्या विविध वयक्तिक कामांमध्ये मदत केलेली आहे. त्यांचे हे काम आमच्यासाठी प्रभावी असून या निवडणूकीत महाविकास आघाडीच्या वतीने उमेदवारी करणाऱ्या खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांना आम्ही जाहिर पाठींबा देत असल्याचे सांगण्यात आले.

### अण्णाभाऊंचे स्मारक हवे

आमच्या समाजासाठी तसेच गोरगरीब, वंचित समाजासाठी खा नीलेश लंके यांनी भरीव कामे केली आहेत. मदतीचा हात दिला आहे. खा. लंके यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाची उभारणी करावी आमची मागणी असून खा. लंके ही मागणी पुर्ण करतील. समाजाच्या अनेक बांधवांना घरकुले मंजुर झालेली असून त्यांना जागा नसल्याने समाज बांधवांना जागा उपलब्ध करून करून द्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. या बांधवांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्याची ग्वाही यावेळी खा. लंके यांच्या वतीने देण्यात आले.

## दारूबंदीला नाही म्हणणारा उमेदवार आम्हालाही नको !

### गडचिरोलीतील ३०९ गावांचा ठराव

**गडचिरोली : प्रतिनिधी**

**गडचिरोली जिल्ह्यातील ३०९ गावांमध्ये मुक्तिपथ व शक्तिपथ गाव संघटनेच्या नेतृत्वात मतदारांनी दारूबंदीला नाही म्हणणारा उमेदवार आम्हालाही नको असा ठराव त्यांनी मंजूर केला आहे.**



गेल्या ३१ वर्षांपासून गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी टिकून आहे. यासाठी जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, महिला-पुरुषांनी अनेक आघाड्यांवर लढाई लढली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, आता निवडणुकीच्या काळात मतदारांना दारूचे प्रलोभन घालून मत मागणाऱ्यांमुळे दारूबंदी तसेच विकासाला खीळ लागण्याची शक्यता आहे. म्हणून दारूबंदीचे समर्थन करणाराच उमेदवार आम्हाला हवा. ही बाब स्पष्ट करून घेण्यासाठी आम्ही सातत्याने जनजागृती करून ठराव मंजूर करून घेतला आहे.

गावातील काही मतदारांनी सांगितले की, आमचे मत हवे असल्यास दारूबंदी समर्थनाचे लिखित

## शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना सत्ता देऊ नका; शरद पवारांचे नागरिकांना आवाहन

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचार सभा घेणे सुरू झाले आहे. अशात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे छत्रपती संभाजीनगर येथील गंगापूर येथे सतीश चव्हाण यांच्या प्रचारासाठी आले होते. यावेळी बोलताना त्यांनी शेतकऱ्यांना दुर्लक्ष करणाऱ्यांकडे सत्ता देऊ नका, असे आवाहन केले आहे. तसेच भाजपवर देखील टीका केली आहे.**

शरद पवार म्हणाले, गेल्या ९ महिन्यात ९५० शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्या का करत आहेत? शेतकऱ्यांनी घाम गाळला, खर्च केला पण त्याच्या उत्पादनातून खर्च निघत नाही, तो कर्जबाजारी होतो, घरादाराचा लिलाव करतो, समाजात अप्रतिष्ठा होते, त्यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलतात, असे शरद पवारांनी सांगितले.



पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, मी कृषी मंत्री असताना यवतमाळ येथे शेतकऱ्याची आत्महत्या झाली, अशी माहिती मिळाली. मी अस्वस्थ झालो आणि तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कानावर गोष्ट घातली. ते आणि मी दिल्लीवरून नागपूरला आलो. तिथून त्याच्या घरी गेलो. तिथं त्या शेतकऱ्याची पत्नी ढसाढसा रडत होती, तिचे अश्रू थांबत नव्हते. कपाशीचे पीक घेतले होते, खते औषध घातली पण पिकावर रोग आला आणि पीक उद्धवस्त झाले. काढलेले कर्ज तसेच राहिले, दुसऱ्या वर्षी तिच स्थिती राहिली, यातून नवरा कर्जबाजारी झाला. सावकारांनी आणि बँकांनी लिलाव काढल्यानंतर ती गोष्ट सहन झाली नाही, त्यामुळे त्या शेतकऱ्याने जीवन संपवले अशी माहिती त्याच्या पत्नीने दिली. नंतर शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी आम्ही दिल्लीत जाऊन निकाल घेतला. देशातील शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्ज आम्ही माफ करून टाकले, शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढले, आज तशाच निर्णयाची आवश्यकता आहे, असे शरद पवार यांनी सांगितले.

शरद पवार म्हणाले, शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे प्रश्न सोडवण्यासाठी जे काही करावे लागेल ते आम्ही करणार आहोत. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांच्या हातात सत्ता द्यायची नाही हा निकाल घ्यावा लागेल. भाजप आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हातून सत्ता काढून घेतली पाहिजे, असे पवार म्हणाले. खोटी आश्वासने देणे हेच यांचे उद्योग आहेत त्यांच्या हाती सत्ता द्यायची नाही. सतीश चव्हाण यांना विजयी करा, असे आवाहन शरद पवारांनी केले आहे.

लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांनी ४०० पारचा नारा दिला होता. ४०० चा आकडा यासाठी की देशाची घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिली आहे, त्यात बदल करण्यासाठी हा डाव मोदी आणि भाजपचा होता. मोदींचे धोरण देशाच्या हिताचे नाही हे लक्षात आल्यावर ठिकठिकाणी त्यांच्या उमेदवारांचा पराभव झाला, असे शरद पवार म्हणाले. पुढे ते म्हणाले, कालच्या निवडणुकीत भाजपचा संविधान बदलाचा डाव राज्यातील नागरिकांनी ओळखून घेतला आणि महाविकास आघाडीचे ३१ खासदार निवडून देत इतिहास घडवला. त्यामुळे मोदींना ४०० जागा मिळाल्या नाहीत आणि घटनेत बदल करू शकले नाहीत.

# शिवसेनेचे नगरसेवक युवराज पठारे यांचा विश्वास

## विखेंच्या आदेशाने आपण दातें सोबत ! शिवसेना नगरसेवक युवराज पठारे यांची भूमिका



पारनेर : प्रतिनिधी

**महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते पारनेरचे रहिवासी आहेत.त्यांना शहराच्या पिण्याच्या पाण्यासह इतर समस्यांची जाण आहे.ते शहराचे प्रश्न सोडवण्यासाठी सक्षम असल्याने तसेच विखेंच्या आदेशाने आपण त्यांच्या प्रचारात कार्यकर्त्यांसह सहभागी झालो असल्याचे शिवसेनेचे (उध्दव ठाकरे) नगरसेवक व विखे समर्थक,युवराज पठारे यांनी स्पष्ट केले. विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत पठारे सक्रिय नसल्याने त्यांच्या भूमिकेबाबत उत्सुकता निर्माण झाली होती.रविवारी (१० ऑक्टोबर) पारनेर येथील भाजप कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत पठारे यांनी आपली भूमिका निःसंदिग्धपणे स्पष्ट केली.**

महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, सुनील थोरात,वसंतराव चेडे, नगरसेवक अशोक चेडे,नवनाथ सोबले,बाळासाहेब पठारे,संजय मते आदी.महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्यापासून विविध उमेदवारांकडून आपणास पाठिंब्याबाबत विनंती करण्यात येत होती.मात्र मी व माझे कुटुंब मंत्री राधाकृष्ण विखे यांचे नेतृत्व मानतो. त्यांच्या सुचनेनुसार तसेच महायुती सरकारच्या माध्यमातून पारनेर शहरासह तालुक्यातील विविध प्रश्न मार्गी लागतील याची खात्री असल्याने आपण दाते यांच्या प्रचारात सक्रिय झाल्याचे पठारे म्हणाले.राज्यात महायुतीचे सरकार येणार असल्याची पुस्ती त्यांनी जोडली.

पठारे म्हणाले की,मी माझ्या वैयक्तीक कामांमुळे निवडणुकीच्या रणधुमाळीपासून काहीसा दूर होतो.मात्र या बाबीचा गैरफायदा घेत विरोधकांकडून माझ्याविषयी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.त्यामुळे आपणास स्पष्टीकरण देणे भाग पडले.अन्यथा विखे कुटुंबायांचा समर्थक या नात्याने मी महायुतीचा घटक आहे.महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या विजयासाठी प्रयत्न करणे ही माझी व माझ्या कुटुंबाची,कार्यकर्त्यांची जबाबदारी असल्याचे पठारे म्हणाले.

> लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुजय विखे यांना पारनेर शहरात मताधिक्य मिळाले आहे. महयुतीचे उमेदवार पारनेरचे रहिवासी आहेत.त्यांना पारनेरमधून जास्तीत जास्त मताधिक्य देण्याचा आपला प्रयत्न आहे.
>
> **युवराज पठारे**
> नगरसेवक.

> शिवसेनेशी माझी गेल्या वीस वर्षांपासून बांधिलकी आहे.त्यातून शिवसैनिकांशी वैयक्तिक पातळीवर ऋणानुबंध निर्माण झाले आहेत.पारनेरचा मी रहिवासी आहे.माझ्या ४० वर्षांच्या समाजकारणात, राजकारणात पारनेरकर नेहमीच माझ्या सोबत राहिले आहेत. शहराच्या विविध प्रश्नांची मला जाण आहे.शहराच्या प्रलंबित पाणी पुरवठा योजनेसह इतर प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपले प्राधान्य राहणार आहे.
>
> **काशिनाथ दाते**
> महायुतीचे उमेदवार.

# राणी लंके यांचा घोंगडी बैठक दौरा पुर्ण

## सोमवारपासून गटनिहाय सभांना प्रारंभ

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीतील पारनेर-नगर मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेला घोंगडी बैठक दौरा रविवारी पुर्ण झाला. नगर तालुक्यातील ४३ तर पारनेर तालुक्यातील ११३ गावांना भेटी देत लंके यांनी मतदारांशी संवाद साधला.**



नगर तालुक्यातील ४३ गावांपासून या घोंगडी बैठकांना प्रारंभ झाला होता. पारनेर तालुक्यातील देसवडे येथील बैठकीने या दौऱ्याचा समारोप झाला. आरोग्य यज्ञ या आरोग्य विषयक शिबिराच्या माध्यमातून लंके यांनी यापूर्वी गावागावांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला होता. त्यानंतर बुथ कमिटयांच्या मेळाव्याच्या निमित्तानेही राणी लंके यांचा गावागावांशी संपर्क झाला होता. निवडणूकीपूर्वीच लंके यांच्या प्रचाराच्या दोन फेऱ्या झाल्या होत्या.

घोंगडी बैठकीच्या निमित्ताने राणी लंके यांनी विविध गावांतील नागरीकांचे प्रश्न, समस्या समजाउन घेत त्याची नोंद घेण्यात आली. हे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी निवडणूकीनंतर पाठपुरावा करण्याची ग्वाही लंके यांनी विविध नागरीकांना दिली. जे प्रश्न तात्काळ माग लावणे शक्य होते त्याची सोडवणूकही करण्यात आली. पंचायत समितीच्या गणनिहाय घोंगडी बैठकांचे आयोजन करण्यात येऊन त्यासंदर्भातील माहिती संबंधित गावांतील कार्यकर्त्यांना आगाऊ देण्यात आली होती. त्यामुळे दिलेल्या वेळेत संबंधित गावातील नागरीक या घोंगडी बैठकांना मोठया प्रमाणात उपस्थित राहून राणी लंके यांच्याशी संवाद साधत होते. दोन्ही तालुक्यांमधील सर्वच गावांमध्ये राणी लंके व त्यांच्या समवेत असलेल्या महिलांचे उस्फुर्त स्वागत करण्यात येत होते.

> **महिलांची उपस्थिती सुखावणारी**
>
> विविध गावांमधील घोंगडी बैठकांना नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रत्येक गावातील नागरिकांशी नेहमीचाच संपर्क असल्याने नागरिकांकडून प्रेमाने स्वागत करण्यात येत होते. महिला उमेदवार असल्याने प्रत्येक गावामध्ये घोंगडी बैठकांच्या उपास्थितांमध्ये महिलांची असलेली लक्षणीय संख्या निश्चित सुखावणारी होती.
>
> **राणी नीलेश लंके**
> उमेदवार, महाविकास आघाडी

> **फटाक्यांची आतिषबाजी, जेसीबीमधून पुष्पवृष्टी**
>
> विविध गावांमध्ये राणी लंके यांचे जोरदार स्वागत करण्यात येत होते. फटाक्यांची आतिषबाजी, जेसीबीमधून पुष्पवृष्टी करत, दारापुढे सडा रांगोळया घालून, ठिकठिकाणी औक्षण करीत लंके यांच्या रॅलीचे स्वागत करण्यात येत होते.

# विविध क्रीडा संघटनांचा आ. जगतापांना पाठिंबा

## आ. जगताप यांच्या कामावर क्रीडा प्रेमी समाधानी



नगर : प्रतिनिधी

**जिल्हा ऑलंपिक संघटनेशी संलग्न असलेल्या विविध क्रीडा संघटना, क्रीडा शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक, एकविध क्रीडा संघटना व ज्येष्ठ खेळाडूंच्या वतीने आ. संग्राम जगताप यांना बिनशर्त पाठिंबा जाहिर करण्यात आला.**

शहरातील क्रीडा संघटना, सर्व खेळाडूंसाठी वेगवेगळया माध्यमातून करण्यात आलेली मदत, खेळाडूंचा केलेला सन्मान, खेळाडूंसाठी पायाभुत सुविधांची केलेली उभारणी यावर क्रीडा प्रेमी समाधानी आहेत. नगर शहर विधानसभा मतदारसंघात गेल्या १० वर्षापासून आ. संग्राम जगताप प्रतिनिधीत्व करत आहेत. या दहा वर्षांच्या काळात आ. जगताप यांनी खेळाडूंसाठी लागणाऱ्या सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्हा क्रीडा संकुलातील विविध खेळाची मैदाने तसेच सोयी सुविधांसाठी ५१ कोटींच्या निधीला आ. संग्राम जगताप यांच्या प्रयत्नामुळे राज्य सरकारची मंजुरी मिळाली आहे. त्यातील पहिल्या टप्प्यातील साडेपंधरा कोटींच्या खर्चाला प्रशासकीय मान्यताही मिळाली आहे. आ. जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा क्रीडा संकुल कात टाकणार आहे. क्रीडा प्रेमींसाठी केलेल्या कामामुळे प्रभावित होउन अहमदनगर जिल्हा ऑलंपिक संघटनेशी संलग्न असलेल्या सर्व क्रीडा संघटनांची आ. जगताप यांना बिनशर्त पाठींबा दिला आहे.

अहमदनगर हॉलीबॉल असोसिएशन, अहमदनगर ॲथलेटिक्स असोसिएशन, अहमदनगर सायकलिंग असोसिएशन, अहमदनगर बॉल टेनिस असोसिएशन, अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशन, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन, अहमदनगर जिल्हा कॅरम असोसिएशन, अहमदनगर मल्लखांब असोसिएशन, अहमदनगर रोल बॉल असोसिएशन, टिम टॉपर्स स्केटींग अकॅडमी,आईस ऑफ स्टॉक असोसिएशन, सावेडी बास्केटबॉल असोसिएशन, युथ स्पोर्टस ॲथलेटिक्स अकॅडमी, अहमदनगर जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट संघटना, अहमदनगर जिल्हा हौशी कबडडी संघटना, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहमदनगर जिल्हा पावर लिफिटंग असोसिएशन, अहमदनगर जिल्हा वेट लिफिटंग असोसिएशन, अहमदनगर जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन, अहमदनगर जिल्हा एरोबिक्स असोसिएशन, अहमदनगर जिल्हा जलतरण संघटना, अहमदनगर जिल्हा ट्रायथलॉन संघटना, कै. बाळासाहेब पवार स्मृती करंडक स्पर्धा समिती, यंग मेन्स ज्युदो ॲण्ड मार्शल आर्ट असोसिएशन, अहमदनगर जिल्हा कुराश असोसिएशन, अहमदनगर जिल्हा मल्लखांब असोसिएशन, अहमदनगर जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन, जिल सॉफटबॉल असोसिएशन, जिल्हा हॉकी असोसिएशन, जिल्हा लंगडी असोसिएशन, टॉपर्स क्रीकेट अकॅडमी, ट्रेक रेसर्स स्पोर्टस फाउंडेशन, जिल्हा जिनमॅटिक असोसिएशन, जिल्हा स्काउट असोसिएशन, जिल्हा कायकिंग असोसिएशन, जिल्हा कानोईग असोसिएशन, जिल्हा किब बॉल असोसिएशन, जिल्हा बॉल टेनिस असोसिएशन, जिल्हा सायकलिंग असोसिएशन, साईनाथ क्रीडा बहुउददेशीय मंडळ, जिल्हा बेसबॉल असोसिएशन, जिल्हा रोईग असोसिएशन, जिल्हा रोलिंग असोसिएशन, जिल्हा मिनीगोल्फ असोसिएशन, जिल्हा कॅरम असोसिएशन, विरेंद्र क्रीडा मंडळ, सहयोग क्रीडा मंडळ, जिल्हा मॉडर्न पेंटस असोसिएशन, अहमदनगर बॅडमिंटन असोसिएशन, जिल्हा कुस्तीगीर संघ, जिल्हा रस्सीखेस संघटना, अहमदनगर सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्टस असोसिएशन, अहमदनगर कॉर्फ बॉल असोसिएशन,अहमदनगर कायकिंग ॲण्ड कनोइंग असोसिएशन, अहमदनगर चेस असोसिएशन, अहमदनगर आईस स्टॉक असोसिएशन, अहमदनगर पॅरालिंपींग असोसिएशन या संघटनांचा समावेश आहे.

> **यांची उपास्थिती**
>
> डेव्हिड मकासरे, शैलेश गवळी, अविनाश काळे, निर्मल थोरात, रावसाहेब बाबर, संजय धोपावकर, रॉनय फर्णांडिस, प्रदीप जाधव, खलिद सययद, राजेंद्र पाटोळे, प्रमोद आठवाल, सचिन गायकवाड, प्रदीप पाटोळे, राहुल जामगांवकर, नंदेश शिंदे, शंतनू पांडव, प्रशांत गंधे, विनायक भुतकर, मनोज गायकवाड, सुरेखा खैरनार, कपिल पवार, प्रसाद पाटोळे, मल्हार कुलकर्णी, महेश आनंदकर, प्रशांत पाटोळे, मुकुंद काशिद,सचिन भापकर, सनी साळवे, अनिल राठोड, अमित चव्हाण, अनिहेत काळगे, कृष्णा लांडे,संतोष गाडे, सचिन सप्रे, संतोष घोरपडे, मोहित भगत, प्रशांत निमसे, मनोज ढोले, प्रविण धुर्वे, पांडूरंग उर्फ बंटी गुंजाळ, विजय शिंगारे, सचिन जावळे.

# राणी लंके यांना पाठिंब्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांची रीघ !

## बिनशर्त पाठिंबा देत मोठे मताधिक्य देण्याची ग्वाही

पारनेर : प्रतिनिधी

**महाविकास आघाडीच्या उमेदवार तथा खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांना पाठिंबा देण्यासाठी विविध गावांतील पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांची रीघ लागली असून रविवारी घाणेगांव, यादववाडी तसेच टाकळी ढोकेश्वर येथील पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत राणी लंके यांना बिनशर्त पाठिंबा देण्याची ग्वाही दिली. दरम्यान, यापूर्वही काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लंके यांना पाठिंबा जाहिर केला असून पुढील काही दिवसांत अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते लंके यांची साथ देणार असल्याचे सांगण्यात आले.**



लोकसभा निवडणूकीत आमदार नीलेश लंके यांनी आमदारकीचा राजीनामा देऊन शरद पवार यांच्या पक्षाकडून उमेदवारी केली व निवडणूक जिंकलीही. महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्यासारख्या बलाढय उमेदवाराला धुळ चारीत लोकसभेत पोहचलेल्या खा. नीलेश लंके यांना त्यांच्या पारनेर-नगर मतदारसंघात रोखण्यासाठी विखे यांच्याकडून प्रतिष्ठा पणाला लावण्यात आली होती. विखे यांनी याच मतदारसंघावर लक्ष केंद्रीत करून लंके यांना स्वतःच्या होम ग्राउंडमध्येच घेरण्याचा विखे यांनी प्रयत्न केला खरा, मात्र लंके यांनी या मतदारसंघात भक्कम आघाडी घेत विखे यांना धोबीपछाड दिली होती. काही मोजक्या बुथचा अपवाद सोडला तर लंके यांनी प्रत्येक बुथवर आघाडी घेत या मतदारसंघावर आपलाच प्रभाव असल्याचे दाखवून दिले होते.

विखे यांच्यासारख्या बलाढय उमेदवाराने प्रतिष्ठा पणाला लाऊनही लंके यांना लोकसभा निवडणूकीत त्यांना रोखता न आल्याने लोकसभा निवडणूकीत विखे यांना साथ देणारे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांना सोडून विधानसभेच्या उमेदवार राणी लंके यांना बिनशर्त पाठिंबा देत आहेत.

घाणेगावं येथील विद्यमान उपसरपंच विशाल वाबळे यांच्यासह अविनाश परांडे, संदीप वाबळे, अमोल वाबळे, पवन वाबळे, तुकाराम म्हस्के, प्रकाश शिंगोटे, महेश शिंदे, दिपक गायकवाड, देवेंद्र शिंगोटे यांनी तसेच यादववाडीचे ग्रामपंचायत सदस्य सागर तरडे, मा. ग्रामपंचायत सदस्य अतुल तरडे यांनी खा. लंके यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बिनशर्त प्रवेश करीत राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला. टाकळी ढोकेश्वर येथील संकेत थोपटे, नितीन निवडूंगे, दादाभाऊ निवडूंगे, प्रविण थोपटे, अक्षय निवडूंगे, मंगेश निवडूंगे, आबा थोपटे, सागर थोपटे, दिपक थोपटे, दादाभाऊ पाचपुते, सुभाष निवडूंगे, निलेश थोपटे, राजू थोपटे यांनीही खा. लंके यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत राणी लंके यांना पाठिंबा देण्याचा निर्णय जाहिर केला.

# देहरे परिसरात राणी लंके यांच्या प्रचाराचा धडाका

## ■ महाविकास आघाडीचे कार्यकर्ते सरसावले
## ■ महिला वर्गाची मोठी उपस्थिती लक्षणीय



देहरे : प्रतिनिधी

**नगर तालुक्यातील देहरे व परिसरात महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचाराचा महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या धडाक्यात सुरु केला असून परिसरातील गावे, वाड्या वस्त्या पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.**

या प्रचार शुभारंभ प्रसंगी खासदार नीलेश लंके यांची पुतणी अक्षदा लंके, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या नगर तालुका अध्यक्षा डॉ.मधु कदम, निर्मला काळे, शुभांगी काळे, वर्षा काळे, माजी पंचायत समिती सदस्य व्ही. डी. काळे पाटील, अरूण लांडगे पाटील, चेअरमन यशवंत काळे, निलेश लंके प्रतिष्ठान देहरे अध्यक्ष डॉ.अनिल लांडगे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट नगर तालुका उपाध्यक्ष महेश काळे, आजी-माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुनील बालवे, ग्रामपंचायत सदस्य रमेश काळे, सेवानिवृत्त तहसीलदार श्री. डावरे, माजी चेअरमन हरीदास करंडे, राष्ट्रवादीचे राहुल जाधव, ज्येष्ठ नेते तथा सोसायटीचे संचालक गणपत काळे, ग्रा.पं. सदस्य किरण लांडगे, अजित काळे, अनिल चोर, सादिक शेख, नवनाथ करंडे, माजी उपसरपंच अनिल करंडे, युवा नेते प्रदीप करंडे, उद्योजक सुरेश धनवटे, सुहास गोपाळे, सोपान करंडे, आदिनाथ करंडे, हरिभाऊ करंडे, माजी चेअरमन कैलास डावरे, असलम शेख, अल्पेश शेख शाहरुख शेख, सोसायटीचे माजी संचालक साईनाथ काळे, अनिल पंढरीनाथ लांडगे, सोपान काळे सोसायटीचे संचालक डॉ. जाधव, राजेंद्र बाळासाहेब लांडगे, विकास धोत्रे, उत्तम घागरमाले, नासिर शेख, गणेश जाधव, नवनाथ जाधव, नितीन भांबळ, ज्ञानेश्वर काळे, अक्षय उर्फ मुन्ना लांडगे, अजय आंग्रे, रामदास करंडे, रावसाहेब चोर, प्रकाश पाखरे, बाळासाहेब जेजुरकर, माजी ग्रामपंचायत सदस्य अर्जुन जेजुरकर, रघुनाथ करंडे, माजी सरपंच नामदेव काळे, चंद्रभान काळे, सोपान काळे, सोमनाथ तांबे, पिंटू लांडगे, प्रा. सुहास पाखरे, माजी ग्रामपंचायत सदस्य रामेश्वर काळे, माजी उपसरपंच भाऊ काळे, माजी ग्रामपंचायत सदस्य विक्रम काळे, बी.जी. लांडगे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

खा. नीलेश लंके यांचे देहरे परिसरावर विशेष प्रेम असून या परिसरातील नागरिकांच्या सुख दुखात ते नेहमी धावून येत असतात, या परिसरातील विकास कामांसाठी त्यांनी मोठा निधी उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांना सर्वाधिक मताधिक्य देहरे परिसरातून देवू असा विश्वास यावेळी माजी पंचायत समिती सदस्य व्ही.डी. काळे पाटील यांनी व्यक्त केला.

# आमदार संग्राम जगताप यांच्या स्वागतासाठी नालेगांवकर एकवटले

## ■ शिवसेना नगरसेवक गणेश कवडे संग्रामभैय्यांच्या पाठीशी
## ■ माझ्या कामांवर नागरिकांचा विश्वास : आ. जगताप

नगर : प्रतिनिधी

**सडा-रांगोळया, पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतिषबाजी करीत महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांचे औक्षण करीत प्रचारानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीचे नालेगांवकरांनी जोरदार स्वागत केले. माझ्या कामांवर नागरिकांचा विश्वास असल्याचे आ. जगताप यांनी यावेळी बोलताना सांगितले.दरम्यान, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगरसेवक गणेश कवडे यांनी विकासाच्या मुद्यावर यावेळी आ. जगताप यांना पाठिंबा जाहिर केला.**



अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.१३ मध्ये विकास यात्रा काढण्यात आली होती. या यात्रेच्या स्वागतासाठी नालेगांवकर प्रथमच आपसातील मतभेद, गट तट दुर ठेऊन एकवटल्याचे चित्र पहावयास मिळाले.

यावेळी नागरिकांशी संवाद साधताना आ. जगताप म्हणाले, विकासाच्या मुद्यावर आपण या निवडणूकीत उतरलो असून सर्वच प्रभागांमध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे झाल्याने मतदार आपणास प्रतिसाद देत आहेत. स्वतः मतदारांनीच ही निवडणूक हाती घेतली असून या निवडणूकीतील आपल्या विजयाची केवळ औपचारीकता शिल्लक असल्याचा विश्वास आ. जगताप यांनी व्यक्त केला. मतदानापर्यंत नगर शहरातील मा. नगरसेवक, पदाधिकारी आ. संग्राम जगताप यांना पाठींबा देतील असा विश्वास व्यक्त करून गणेश कवडे यांच्यापासून त्यास सुरूवात झाल्याचे मा. उपमहापौर गणेश भोसले यांनी सांगितले.

यावेळी मा. उपमहापौर गणेश भोसले, दीपक सुळ,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, स्थायी समितीचे सभापती किशोर डागवाले, संभाजी लोंढे, दत्तात्रेय मुदगल, अजय चितळे, नरेंद्र कुलकण, महेश लोंढे, मयुर बोचुघोळ, रवी दंडी, कैलास दळवी, गणेश शिंदे, रणजीत परदेशी, मयुर जोशी, काका शेळके, शांताराम राउत, मुकुंद वाळके, सुहास पाथरकर, नाना देवतरसे, पिंटू पठारे, नितीन डागवाले, सागरक गोरे, सुभाष दारवेकर, गोरख पडोळे, उदय अनभुले, गोपाळ वर्मा, बाळासाहेब गायकवाड, बाळासाहेब शेळके, भास्कर कवडे यांच्यासह ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

> **नालेगावकरांच्या स्वागताने उर्जा मिळाली**
>
> नालेगांवकर माझ्या विजयासाठी गट-तट, हेवे-दावे विसरून एकत्र आले, माझ्या कामांवर विश्वास ठेवला, माझ्या पाठीवर शाबासकीची थाप टाकून मोठया उत्साहात माझे स्वागत केले. तुमच्या स्वागताने मी भारावून गेलो असून त्यातून मला उर्जा मिळाली आहे. हीच उर्जा घेऊन मी अधिक जोमाने शहर विकासासाठी काम करू शकेल.
>
> **आमदार संग्राम जगताप**
> विधानसभा सदस्य

> **विकासकामांमुळेच पाठिंबा**
>
> आमदार संग्राम जगताप यांनी नगर शहरामध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावली आहेत. कामे मार्गी लागल्याने माझ्या विकास कामांना पाठिंबा आहे. शिवसेनेचा शहरामध्ये उमेदवार नाही. आम्ही हिंदुत्व विचाराचे असल्यामुळे महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना या निवडणूकीत पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. आ. जगताप यांच्यामुळे शहर विकासाला गतली प्राप्त झाली असून या पुढील काळात नगर शहर विकसित शहर म्हणून नावारूपास येईल.
>
> **गणेश कवडे**
> मा. नगरसेवक

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com




# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३ मंगळवार १२ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



# माझ्याकडे अनुभव, मी कर्तृत्व सिद्ध करणार !

पारनेर : विशेष प्रतिनिधी


**पंचायत समिती, जिल्हा परिषदेमध्ये मी दहा वर्षे सक्षमपणे काम केले आहे. पंचायत समितीचे उपसभापतीपद तसेच जिल्हा परिषदेची सदस्य असताना जिल्हा नियोजन मंडळाची सदस्य म्हणून काम करताना मी केलेले काम सर्वश्रुत आहे. माझ्याकडे प्रशासनाचा अनुभव आहे, विधानसभेमध्ये मी माझे कर्तृत्व सिद्ध करणार असल्याचा ठाम विश्वास महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

विधानसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून राणी लंके यांचे नाव जाहिर झाल्यानंतर खासदारांच्या पत्नीला विधानसभेची उमेदवारी का असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना राणी लंके म्हणाल्या, खा. लंके यांची मी पत्नी असले तरी दहा वर्षे मी पंचायत समिती व जिल्हा परिषदेत काम केले आहे. मला प्रशासनाचा अनुभव असून सामाजिक व राजकीय क्षेत्रात मी एक तपाहून अधिक काळ काम करत आहे. मी माझे कर्तृत्व सिद्ध केले म्हणून मला जनतेने स्विकारले. विधानसभा निवडणूकीतही मला जनतेने स्विकारले असून मोठया मताधिक्क्याने माझा विजय होणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

नगर तालुक्यात हे राणी लंके या बाहेरच्या उमेदवार आहेत अशी टीका केली जाते त्यावर बोलताना राणी लंके म्हणाल्या खरे तर मी बाहेरची कशी हे त्यांनी स्पष्ट करणे गरजेचे आहे. नगर तालुक्यातील अरणगांव येथील अण्णासाहेब भाउसाहेब शिंदे यांची मी मुलगी असून माझे माहेर नगर असताना ते असा परकेपणा कसा दाखवू शकतात ? खरे तर आमचे लंके कुटूंब असा परकेपणा कधीही करत नाही. आमच्याकडे आलेल्या प्रत्येक व्यक्तिला मदत करण्याची आमची भूमिका असते हे नगर जिल्ह्यालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहे. केवळ मतदारसंघातील व्यक्ति मदत मागण्यासाठी आली तरच मदत करायची अशी भूमिका आम्ही कधीही घेतली नाही व घेणारही नाही. हे विश्वची माझे घर या संकल्पनेतून आम्ही काम करतो असे राणी लंके म्हणाल्या.

विधानसभा निवडणूकीच्या प्रचारात कसा प्रतिसाद मिळतो आहे असे विचारले असता राणी लंके यांनी सांगितले की, केवळ निवडणूक आली म्हणून आम्ही जनतेसमोर कधीही जात नाही.आम्ही २४ तास ३६५ दिवस जनतेमध्ये असतो. त्यांच्या सुख, दुःखात सहभागी होतो. त्यामुळे निवडणूकीचा प्रचार ही केवळ औपचारीकता आहे. तसेही निवडणूकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मतदारसंघातील प्रत्येक गावामध्ये आम्ही घोंगडी बैठका घेऊन मतदारांच्या भावना समजून घेतल्या आहेत. काही ठिकाणी प्रश्न असतील त्याची नोंद घेऊन ते आचारसंहितेनंतर दुर करण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. प्रचाराची पहिली फेरी पुर्ण झाली असून या फेरीमध्ये प्रत्येक गावांमध्ये,प्रत्येक बुथवर मतदारांचा मला मोठा प्रतिसाद मिळाला. आपण पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केलेले काम तसेच खा. नीलेश लंके यांनी साडेचार वर्षे विधिमंडळात मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना कोटयावधींची विकास कामे माग लावल्याने मतदारांकडून आम्हाला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचे राणी लंके म्हणाल्या.













## हीच आमच्या कुटूंबावरील प्रेमाची पावती

आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पारनेरमध्ये दाखल झालेल्या महिलांची संख्या लक्षणीय होती. हजारो महिलांच्या उपस्थितीत पार पडलेली सभा पारनेर शहरातील बाजार तळावर पार पडलेल्या आजवरच्या सभांमध्ये विक्रमी सभा होती. या सभेसंदर्भात विचारले असता राणी लंके म्हणाल्या, माझा अर्ज दाखल करण्यासाठी माझ्या माता भगिनींनी पारनेर येथे उपस्थित राहण्याचा एक संदेश मी पाठविला होता. त्या संदेशावर हजारो महिला पारनेरमध्ये उपस्थित राहिल्या. हीच आमच्या कुटूंबावरील प्रेमाची पावती आहे. हीच आमच्या कुटूंबाची संपत्ती आहे. असे राणी लंके यांनी सांगितले.

## विक्रमी मतांनी विजयी होणार

या मतदारसंघात पंचरंगी लढत होत आहे. या पार्श्वभुमीवर तुमचे मताधिक्क्य किती असेल या प्रश्नावर बोलताना राणी लंके आत्मविश्वासाने म्हणाल्या, किमान एक लाखांच्या मताधिक्क्याने माझा विजय होईल अशी खात्री आमच्या सर्व सहकाऱ्यांना आहे. अनेक गावांमध्ये विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मतभेद विसरून एकत्र आले असून मला एकशिक्की मतदान करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. माझा विजय होणार ही काळया दगडावरची रेघ आहे. एक लाखांहून अधिक मताधिक्क्याने विजय साकारण्यासाठी माझयासह सर्व सहकारी परीश्रम घेत असून त्याला निश्चित यश मिळेल असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

## खा. लंके यांचा विकास रथ पुढे नेणार

विधिमंडळात गेल्यानंतरची तुमची भूमिका काय असेल या प्रश्नावर बोलताना राणी लंके म्हणाल्या, विधिमंडळात गेल्यानंतर खा. नीलेश लंके काय करणार असा प्रश्न विरोधक उपस्थित करत होते. मात्र त्यांनी गेल्या साडेचार वर्षात मतदारसंघात तब्बल दोन हजार कोटींची विकास कामे माग लावत विरोधकांची तोंडे बंद केली. आजवरच्या इतिहासातील विकास निधीचा हा विक्रम आहे. गावागावांमध्ये विकास कामे माग लागली आहेत. आता खा. नीलेश लंके हे लोकसभेत गेले असून आपण विधानसभेत गेल्यानंतर त्यांच्या विकासाचा रथ असाच पुढे नेण्याची माझी भूमिका असणार आहे. विकास कामे माग लावण्याची खा. नीलेश लंके यांची एक हातोटी आहे, त्याच पध्दतीने आपण विविध विभागांमधून विकास कामांसाठी निधी मंजुर करू आणू. समाजातील विविध प्रश्नांवर सभागृहात आवाज उठविणार असल्याचे राणी लंके म्हणाल्या.

## विविध प्रश्नांवर आवाज उठविणार

1 विधानसभा निवडणूकीत विजयी झाल्यानंतर तुम्ही मतदारसंघाच्या पहिल्या आमदार असणार आहात. विधानसभेत तुम्ही महिलांसाठी काय भूमिका मांडणार या प्रश्नावर पहिली आमदार होण्याचा मला निश्चित सार्थ अभिमान असल्याचे राणी लंके यांनी सांगितले.

2 विधिमंडळात गेल्यानंतर महिला सक्षमीकरणासाठी मी पुढाकार घेणार असून राज्यात महिला, तरूणींवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात कठोर कायदा करण्यासाठीही आपण आवाज उठविणार आहोत. पारनेर तालुक्याचे हक्काचे एक टीएमसी पाणी, साकळाई योजना, डिंबे ते माणिकडोह बोगदा, जातेगांव उपसा सिंचन योजना, राळेगणसिध्दी व इतर नऊ गावांची पाणी योजना, पुणेवाडी उपसा सिंचन योजना, कान्हूरपठार उपसा सिंचन योजना तसेच शिवडोह या महत्वाकांक्षी योजना माग लावण्यासाठी मी माझी प्रतिष्ठा पणाला लावणार असल्याचे लंके म्हणाल्या. तांत्रिक मंजुरी मिळूनही केवळ राजकीय आकासातून आडविण्यात आलेली पारनेर शहराच्या पाणी योजनेस मंजुरी मिळविण्यासाठीही आपण आग्रही असणार आहोत.

3 राज्यातील नागरीकांचा मुड पाहता राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार यात कोणतीही शंका राहिलेली नसून महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर राज्यातून महाविकास आघाडीचे सरकार पायउतार झाल्यानंतर रखडविण्यात आलेल्या सर्व योजना आपण माग लावून घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## माझ्या मेरीटवर माझी उमेदवारी

तुम्हाला उमेदवारी जाहिर झाल्यानंतर विरोधकांकडून घराणेशाहीची टीका करण्यात आल्याच्या पार्श्वभुमीवर बोलताना राणी लंके म्हणाल्या, एक खासदाराची पत्नी म्हणून नव्हे तर माझ्या कामाच्या मेरीटवर मला महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उमेदवारी दिली आहे. मी पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून केलेले प्रभावी काम, सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रमात दिलेले योगदान तसेच महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या उपाययोजना यांचा विचार करून माझ्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे आमच्यावर होणारा घराणेशाहीचा आरोप साफ चुकीचा आहे. माझ्याकडे काही मेरीट नसते तर माझ्या उमेदवारीचा विचारच झाला नसता. शिवाय माझी उमेदवारी जाहिर होउन आम्ही प्रचार सुरू केल्यानंतर मतदारांकडून मिळत असलेला प्रतिसादच माझे मेरीट अधोरेखीत करते असेही लंके म्हणाल्या.




# पारनेर-नगर मतदारसंघावर लंके दाम्पत्याचीच छाप !

## विकास कामे आणि सामाजिक उपक्रमांत अग्रेसर

**पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार म्हणून साडेचार वर्षांची खा. नीलेश लंके यांची कारकिर्द गाजली ती कोटयावधी रूपयांच्या विकास निधीमुळे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासात खा. लंके यांनी मतदारसंघासाठी तब्बल २ हजार कोटींचा निधी निधी खेचून आणला. विकास कामांबरोबरच विविध सामाजिक उपक्रमांमध्येही खा. नीलेश लंके व त्यांच्या पत्नी राणी लंके हे दाम्पत्य अग्रेसर आहे.**

विधानसभा निवडणूक जिंकल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी आपल्या पदाला न्याय देत प्रत्येक गावामध्ये विकास कामे कशी पोहचतील याची काळजी घेतली. त्यामुळेच कोणत्याही गावात पोहचले की विकास कामांचे अस्तित्व दिसून येते. विकास कामे करताना खा. लंके यांनी आपले मतदार अथवा आपले विरोधक असा भेदभाव कधीही केला नाही. त्यामुळेच गेल्या पाच वर्षात खा. लंके यांची विविध गावांमध्ये राजकीय बेरीज झाल्याचे चित्र आहे.

कुकडी कालव्याच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या गावांना योग्य पध्दतीने आवर्तन मिळावे यासाठी खा. लंके यांनी नेहमीच पुढाकार घेतला. मळगंगा देवी यात्रोत्सवानिमित्त भाविकांच्या मागणीनुसार आवर्तन सोडण्यासाठीही लंके यांनी घेतलेला पुढाकार सर्वश्रुत आहे.

मतदारसंघातील अनेक गावांना जोडणारे रस्ते ग्रामीण मार्ग होते. त्यांची दर्जोन्नती करण्यात येऊन ते जिल्हा मार्ग करण्यात आले. दर्जोन्नती करण्यात आल्याने राज्य सरकारकडून विविध रस्त्यांना निधी मंजुर करून आणण्यात खा. लंके यांना यश आले. या निधीमुळे मतदारसंघातील बहुतांश रस्ते दर्जदार झाले आहेत.

### मोहटादेवी दर्शन यात्रा

1 नवरात्रोत्सव महिलांसाठी मोठया श्रध्देचा विषय. विशेषतः ग्रामीण भागातील महिला वर्षभर चुल, मुल आणि शेतीच्या कामात व्यस्त असतात. नवरात्रात नऊ दिवसांचा उपवास करणाऱ्या या माता माऊल्यांना देवीच्या दर्शनाची आस असते. मात्र या ना त्या कारणाने त्यांचे देवीचे दर्शन घडत नाही.

2 या माय माऊल्यांना नवरात्रोत्सवात देवीचे दर्शन व्हावे या हेतूने राणी लंके यांच्या संकल्पनेतून गेल्या काही वर्षांपासून मोहटादेवी यात्रेचे नियमितपणे आयोजन करण्यात येते. स्वतः राणी लंके या दररोज जाणाऱ्या यात्रेसोबत उपस्थित असतात. त्यांच्या फराळाची, पिण्याच्या पाण्याची, दर्शनाची व्यवस्था पाहण्याबरोबरच सोबत आलेली माय माऊली तिच्या घरी जाईपर्यंतच्या व्यवस्थेवर लंके दाम्पत्याचे लक्ष असते.

3 मोहटादेवी यात्रोत्सवामुळे मतदारसंघातील माता माऊल्यांचे आणि राणी लंके यांचे अतुट नाते निर्माण झाले आहे.




### शालेय विद्यार्थ्यांना १० हजार सायकल

विविध वाडया, वस्त्यांवरून शाळांमध्ये पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना खा. नीलेश लंके, राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून १० हजारांवर विद्यार्थी, विद्यार्थीनींना सायकलचे वितरण करण्यात आले. खा. लंके हे सत्कार न स्विकारता त्या बदल्यात शालेय साहित्य स्विकारतात. संकलित झालेले शालेय साहित्य विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत वितरीत करण्यात येते. अनवाणी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही चप्पलची व्यवस्था करून देण्यात खा. लंके हे पुढाकार घेत आपली सामाजिक बांधिलकी जपतात.





### स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत

विविध स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना नीलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून मदत केली जाते. गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्याबरोबरच ऑनलाईन क्लासेस, मुलाखतीची तयारी याबाबतही लंके प्रतिष्ठाकडून पुढाकार घेण्यात येऊन जास्तीत जास्त विद्यार्थी शासकीय सेवेत जावेत यासाठी पुढाकार घेण्यात खा. लंके, राणी लंके हे नेहमीच आघाडीवर असतात.

### अभ्यासिका

स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मार्गदर्शन मिळावे या हेतूने खा. लंके यांनी निघोज व कान्हूरपठार येथे अभ्यासिकांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. दोन्ही अभ्यासिकांची उभारणी झाली असून निघोज येथील अभ्यासिकेमध्ये प्रत्यक्ष स्पर्धा परिक्षा देणारे उमेदवार या अभ्यासिकेचा वापरही करू लागले आहेत. मतदारसंघातील जास्तीत जास्त विद्यार्थी उच्च पदस्थ नोकऱ्यांमध्ये असावेत या हेतूने मतदारसंघात आणखी काही अभ्यासिका उभारण्याचाही खा. लंके यांचा मानस आहे.



### कृषि प्रदर्शन

शेतकऱ्यांना शेतीमधील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहीती मिळावी यासाठी खा. नीलेश लंके व राणी लंके यांच्या संकल्पनेतून कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रदर्शनाचा आजवर लाखो शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे.या प्रदर्शनातील तंत्रज्ञानाचा उपयोग करून मतदारसंघातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून शेती उत्पादनांमध्ये वाढ करण्यात यश मिळविले आहे. विविध बचत गटांच्या स्टॉलमधून बचत गटांना मोठा व्यवसाय उपलब्ध झाल्याने बचत गटांच्या भांडवलामध्ये वाढ झाली आहे.

### आरोग्य शिबिर


महिलांमध्ये विशेषतः ब्रेस्ट कॅन्सरचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढत आहे. या आजारापासून ग्रामीण महिलांचा बचाव करण्यासाठी राणी लंके यांच्या संकल्पनेतून अलिकडेच ब्रेस्ट कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मतदारसंघातील हजारो महिलांनी त्याचा लाभ घेतला. ज्या महिलांमध्ये या आजाराची लक्षणे आढळून आले त्यांच्यावर उपचार करण्यात आले. याच शिबिरादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरालाही मोठा प्रतिसाद लाभला. रक्तदात्यांना खा. नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने या रक्तदात्यांना पाच लाख रूपयांच्या विम्याचे कवच देण्यात आले.

### राज्यात सर्वाधिक सहाय्यता निधीची मदत

विविध आजारांमुळे रूग्णालयात दाखल असलेल्या गरजू रूग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच खासदार झाल्यानंतर पंतप्रधान सहाय्यता निधीमधून निधी मिळवून देण्यातही खा. नीलेश लंके यांनी तत्परता दाखविली आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये सर्वाधिक मदत मिळवू देणारे आमदार म्हणून खा. नीलेश लंके हे राज्यात अव्वलस्थानी आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे यांनीच ही माहीती सार्वजनिकरित्या जाहिर केली आहे. यावरून खा. लंके हे नागरीकांच्या अडचणी दुर करण्यासाठी किती गांभीर्याने काम करतात याची प्रचिती येते.

### धर्मदाय रूग्णालयांतही उपचार

धर्मदाय रूग्णालयांत गरजू रूग्णांसाठी राखीव असलेल्या कोटयामधून रूग्णांना उपचार मिळवून देण्यातही खा. लंके हे आघाडीवर आहेत. लंके यांच्या संपर्क कार्यालयात कोणताही रूग्ण किंवा त्याचा नातेवाईक आल्यानंतर आरोग्य सेवेसाठी उपलब्ध असलेल्या कक्षाचे अनिल चौधरी हे कोणत्या योजनेतून या आजारासाठी मदत मिळू शकते याची माहीती घेतात. योजनेतून उपचार होत नसल्यास खा. लंके हे धर्मदाय रूग्णालयांशी संपर्क करून त्या रूग्णाला मोफत उपचार मिळवून देण्यासाठी शिफारस करतात. बहुतांश रूग्णांना धर्मदाय रूग्णालयातून उपचार मिळवून देण्यात खा. लंके हे यशस्वी झाले आहेत. अनेक खाजगी रूग्णालयांमध्येही रूग्णांच्या बिलांमध्ये सवलत मिळावी यासाठी लंके हे रूग्णालय व्यवस्थापनास नेहमीच विनंती करतात. व्यवस्थापनाकडून त्यांच्या विनंतीस मान दिला जाऊन रूग्णांना दिलासा मिळतो.



### शिवस्वराज्य यात्रा आणि शिवपुत्र संभाजी महानाटय

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे जिवनचरित्र गावागावांमध्ये पोहचविण्यासाठी राणी लंके यांच्या संकल्पनेतून नगर दक्षिण मतदारसंघात शिवस्वराज्य यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. खा. अमोल कोल्हे यांच्या शिवपुत्र संभाजी महाराज या महानाटयाचेही नगर येथे आयोजन करण्यात आले. लाखो नागरिकांनी त्याचा लाभ घेतला.

खासदार नीलेश लंके यांना भेटायचे म्हणून कोणी हंगे या त्यांच्या गावी जाणार असलाच तर वेशीतून गावात शिरताच उजवीकडे वळून जाताना सर्वप्रथम दिसणाऱ्या माडीवजा इमारतीकडे अजिबात जाऊ नका. ती त्यांची नाही. त्यांच्या शेजाऱ्यांचं घर आहे ते. त्या इमारतीच्या मागे एक बैठं घर दिसेल. अगदी छोटं. जुन्या काळातील बांधकाम असलेलं. त्या घरासमोर चेहऱ्यात साधारण साम्य असलेल्या दोन गृहिणी काम करताना दिसतील. एखादी भांडी घासत असेल. तर दुसरी कपडे धुवून वाळत घालत असेल किंवा सुकलेले कपडे गोळा करत असेल. ही दोन्ही कामे संपली असतील, तर अन्य काही घरकाम करत घरी आलेल्या कोणातरी पाहुण्यांचा पाहुणचार करताना दिसतील. त्या घरी जा. तेच लंके यांचे घर होय. आणि ज्या दोघी तिथे काम करत असतील त्या दोघी सख्या बहिणी असून... त्यांपैकी एक खुद्द नीलेश लंके यांच्या सौभाग्यवती राणीताई लंके आहेत. लंके यांच्या सौ. इतकीच त्यांची ओळख नाही बरं. स्वतः त्या जिल्हा परिषद सदस्य आहेत! जिल्हा परिषदेच्या सभागृहात जनहिताच्या मुद्यांवर धडाडणारी मुलूखमैदान तोफ अशी त्यांची ओळख देखील आहे.

एका खासदाराची सौभाग्यवती, स्वतः झेडपी सदस्य असलेली ही माऊली जरासाही अभिमान किंवा स्वाभिमान म्हणा की अहंकार, न बाळगता घरची झाडलोट, भांडीकुंडी आणि कपडे धुणे आदी कामे करत असते. घरकाम करण्यासाठी नोकरचाकर असणे, हे या कुटूंबाच्या गावीही नाही. अत्यंत शांत संयमी आणि सोज्वळ असलेल्या सौ. राणीताई लंके आपल्या कौटुंबिक जबाबदारीला देखील अगदी हसतमुखाने न्याय देतात. तुम्ही त्यांच्या घरी गेलात तर अगदी सर्वसामान्य गृहिणीप्रमाणे तुमचे स्वागत करतील, तुम्हाला बसायला सांगतात. हातातली कामे संपवून त्या तातडीने चहा नाष्ट्याचे बघतात. एवढंच नाही तर आलेल्या प्रत्येक पाहुण्यासाठी त्या आवर्जून वेळ काढतात. त्यांचं म्हणणं ऐकून घेतात. त्यावर तोडगा काढण्याचा शब्द देतात आणि जाता जाता जेवण करूनच जा असं आपुलकीने सांगतात देखील..! इतक्या त्या साध्या सरळ मनाच्या आणि आपलेपण जपणाऱ्या आहेत.

आनंद आणि समाधान जणू या कुटुंबाची दैवी देणच आहे. प्रत्येकाशी हसतमुखाने बोलणे, उत्साहाने आणि अजिजीने स्वागत करणे, आग्रह करून करून त्या त्या वेळेनुसार चहा नाष्टा किंवा जेवण करण्याविषयी विचारणे, ही आपुलकी प्रत्येकाच्या वागण्या बोलण्यातून अगदी स्वच्छ जाणवत राहते. नव्हे प्रत्यक्ष अनुभवायलाच मिळते. त्यासाठी या कुटुंबाचा आपलेपणा अनुभवायला किमान एकदा तरी त्यांच्या घरी जावेच, असे हे कुटुंब आहे. पाहुणचार घेऊन आपण जेव्हा निघू तेव्हा आवर्जून सर्वजण बाहेर पर्यंत सोडायला येतात. खुद्द गुरुजी आणि आक्का 'पुन्हा या बरका. आणि पुढच्या वेळी असं घाई घाई येऊ नका. निवांत जेवायलाच या', असे सांगत अगदी आपल्या गाडीपर्यंत सोडायला येतात, तेव्हा खरे पटते, की नीलेश लंके यांची समाजाप्रति असलेली ओढ, ही त्यांच्या आई वडिलांची पुण्याई आहे.

नीलेश लंके अगदी सुरुवातीच्या काळापासून झोकून देऊन काम करीत होते. गावपातळीवर काम करताना एकीकडे लोकांची कामे करत असतानाच ते नेतेपदास पोहोचले. पण सुरुवातीच्या काळात स्वतः ग्रामपंचायत सदस्य सदस्य नसल्याचा त्यांना फायदाच झाला. पदामध्ये गुंतून पडलेले नसल्याने त्यांनी लोकांची कामे करण्यावर जास्त भर दिला. गावात सत्ता त्यांचीच असल्याने कामे लीलया होऊ लागली. दुप्पट वेगाने ते कामाला लागले आणि हा हा म्हणता ते शिवसेनेचे





शाखाप्रमुख ते तालुका प्रमुख झाले. पक्षात वजन वाढलं. तालुक्यात नाव गेलं. जिल्हा परिषद, पंचायत समितीत उठबस वाढली. आणि त्यांनी पंचायत समिती समजून घ्यायला सुरुवात केली. राजकीय पटलावर अथक कष्ट आणि अहोरात्र झटून काम करण्याच्या झपाट्याने एकामागून एक यश मिळत होते. त्याच वेळी कौटुंबिक आणि घरगुती विषयांतून मात्र हा माणूस आणखी लांब लांबच चालला होता. नीलेशराव घरी येणाऱ्या पाहुण्या-रावळ्यांसाठी आणि सख्या सहोदरांसाठी वाट्टेल ते करण्यास एका पायावर तयार असत. हेच कारण होते, की घरी सतत कार्यकर्त्यांचा राबता वाढू लागला. भल्या सकाळी सुरू झालेली कार्यकर्त्यांची लगबग रात्री उशिरापर्यंत सुरूच राहू लागली. त्यांच्यासाठी चहा नाष्ट्यापासून जेवणापर्यंत करण्यात आक्का व्यस्त राहू लागल्या. आपल्या नीलेशचा मित्र आहे, त्याचा कार्यकर्ता आहे, त्याला हवं नको ते बघितलंच पाहीजे, या भावनेने घरी आलेला पाहुणा 'जेवल्याशिवाय जाणार नाही' ही लंके यांच्या घरची परंपराच होऊन गेली, ती आजवर कायम आहे.

नीलेश लंके कलाकलाने राजकीय सामाजिक क्षेत्रात पुढे पुढे सरकत होते. योग्य वेळ पाहून गुरुजींनी दीपकचे लग्न उरकून घेतले. त्यांच्या मेव्हण्याची म्हणजे अक्कांच्या भावाचीच मुलगी सुनबाई म्हणून घरी आणली. थोरल्याचा संसार सुरू झाला. अवघ्या दोन खोल्यांचं घर. त्यात सूनबाईंच्या रूपाने आणखी एक माणूस वाढले. घर वाढवायला हवे. असा विचार एकीकडे गुरुजी आणि आक्का करत होते; मात्र पैशाचे काय? तो कुठून कसा उभा करणार. बघूया होईल आज ना उद्या. पोरं हाताशी आली आहेत. करतील काहीतरी, म्हणत दोघांनी तो विषय निव्वळ वाट बघण्यावर सोडून दिला. तो विषय उभयतांनी तेव्हा सोडलाय तो आजही पेंडिंग आहे.

हे खास इथे सांगावे लागेल. खासदार नीलेश लंके नावाचा माणूस आजही वडिलांनी उभारलेल्या दोन खोल्यांच्या घरात राहतो आहे. पावसाळ्यात छत गळतंय. ते पाणी टपकणाऱ्या जागी घरातील पातेली, डबे ठेवून आक्का आणि त्यांच्या दोन्ही सुना घर ओले होण्यापासून वाचवत असतात. त्यातच आलेल्या पाहुण्यांची उठबस, जेवणे खाणे, होतात. खासदार साहेबांना भेटायला आलेली मंडळी त्याच जुन्या खाट आणि दोन्हीकडे डब्यावर ठेवलेल्या एका फळीवर बसतात. नाही म्हणायला प्लास्टिकच्या चार खुर्च्या घेतल्यात गुरुजींनी. पण त्या ठेवायला जागा कुठाय. दहा बाय बारा आकाराचा हॉल आणि आतली तेवढीच किंबहुना स्वयंपाकाच्या साहित्याने भरून गेल्याने आणखी बारीक झालेली खोली. इतकेच काय ते घर. त्यात खुर्च्या मांडायच्या तरी कुठे. या इवल्याश्या घरातली माणसं मात्र अंतरी सागराचं मन बाळगून आहेत. घरात गेलेला कोणीही नवा माणूस पुढच्या अवघ्या पाच मिनिटांत त्या घरचा सदस्य होऊन जातो; आणि 'नको हो आक्का चहा, आताच घेऊन आलोय, नाष्टा झालाय...' वगैरे सांगायला सुरुवात करतो. इतक्या आपुलकीने त्या घरात पाहुण्यांची सरबराई केली जाते.

नीलेश लंके यांचा सामाजिक लवाजमा वाढतच होता. त्याचे घरी येणे मध्यरात्री बाराच्या आत कधीच नव्हते. बहुतेक वेळा तर पहाटेच येत असे स्वारी घरी. आणि घरी आल्याशिवाय जेवण नाही. बाहेर कुठेही जेवणार नाही. कितीही उशीर होवो, घरी येऊन घरचंच खाणार. हा शिरस्ता नीलेश लंके यांनी आजही कायम ठेवला आहे. बऱ्याच वेळा घरातून राणीताईंनी तयार केलेला डबा दिला जातो. दोनेक चपात्या आणि असेल ती ओलीसुकी पालेभाजी किंवा डाळ, जे काही असेल तेच त्यांचे जेवण. तो डबा जर का बाहेर खायला वेळ मिळाला नाही, तर घरी आल्यावर त्याच डब्यातले जेवण करून डबा विसळून ठेवणे आणि झोपणे, ही नीलेश लंके यांची जेवण करण्याची पद्धत आजही तशीच कायम आहे.

नीलेश लंके यांचा विवाह सोहळा सुद्धा असाच अफलातून आणि घडवून आणलेला एक उत्सव आहे. सुरुवातीस तर आपल्याला लग्न करायचेच नाही, यावर ठाम असलेले आमदार साहेब जेव्हा तयार झाले, तेव्हा सुद्धा 'बघा तुम्हीच मुलगी आणि सांगा मला, कुठं कधी उभं रहायचं ते. राहतो उभा. म्हणाले होते. ज्या माणसाचा घरात पायच ठरत नाही. समाज समाज आणि समाज हेच ज्याचं सर्वस्व आहे. आणि ही त्याची ख्याती अवघ्या तालुक्यात पोहोचली आहे, त्याला लग्नासाठी पोरगी देणार तरी कोण? हा प्रश्न गुरुजी आणि अक्कासमोर उभा होता. अखेर अक्काचं माहेर कामी आलं. थोरल्या सूनबाईंची धाकटी बहीण म्हणजे राणीताई लग्नाची होती. आक्कांनी भाऊरायाकडे सांगावा धाडला आणि योग जुळून आला. सुशिक्षित असलेल्या त्या मुलीनेही कोणाशी लग्न लावून देत आहात, किंवा मुलगा काय करतो, कसा आहे, याबाबत अवाक्षरही न काढता बोहल्यावर चढण्याची तयारी दाखवली. लग्न झालं. संसार सुरू झाला. साधारणपणे 'लग्न झालं, की पोरं सुधारतात. घराकडे लक्ष देऊ लागतात' अशी एक आपली मराठमोळी म्हणा की एकूणच मनुष्यजमातीची धारणा आहे. तथापि नीलेश लके यांच्यासाठी लग्न म्हणजे 'रुटीन लाईफ' मधली अजून एक घटना इतकंच होतं. घरी येणाऱ्या पाहुण्यांसाठी आणि आपल्या कार्यकर्त्यांसाठी चहा नाष्टा आणि स्वयंपाक करून देण्यासाठी अजून एक सदस्य आला, इतकीच काय ती त्यांची स्वतःची भावना होती. घरी देण्यासाठी त्यांच्याकडे एकही दिवस शिल्लक नव्हता. आजही स्वतः ते आणि त्यांचे काही मित्र नित्यनेमाने वैष्णो देवीच्या दर्शनाला जाऊन येतात. पारनेर तालुका आणि अन्य जवळपासच्या शेकडो भाविकांना दरवर्षी त्यांच्या पुढाकारातून मोहटा देवीची यात्रा घडवून आणली जाते. या दोन्ही ठिकाणी आजतागायत लंके यांच्या घरातील ना आक्का किंवा गुरुजी गेलेत, ना दोन्ही सुनांपैकी कोणी गेले आहे.यावर्षी मात्र राणीताईंनी मोहटा देवीच्या भाविकांसाठी सेवा दिली. स्वतः हाताने स्वयंपाक करुन खाऊ घातला.



अशा या कुटुंबात आलेली नवी सूनही नात्यातलीच म्हणजे अक्कांच्या भावाची छोटी मुलगी आहे. त्यामुळे तिलाही नीलेश यांच्याबाबत फारसे काही सांगत बसण्याची वेळ आली नाही. बालपणापासून त्यांचा स्वभाव आणि समाजासाठी अहोरात्र झटणाऱ्या माणसाशी आपले लग्न होत आहे, हे त्यांना आधीच माहीत होते. त्यामुळे लागलीच त्या या कुटुंबात समरसून गेल्या. सख्या बहिणी सख्या जाऊबाई झाल्या आणि कुटूंबात आणखी एक सदस्य वाढला. इकडे नीलेश लंके यांचे समाजकार्य सुरूच होते. त्यात कधीही कसलाही खंड पडलेला नाही. बघता बघता उभयतांच्या लग्नाला बारा वर्षे पार पडली असून दोन बाळगोपाळ घरी नांदत आहेत.

राणीताईंनी कौटुंबिक जबाबदारीला न्याय देताना सामाजिक क्षेत्रातही पतीच्या खांद्याला खांदा लावून काम केले आहे. किंबहुना त्या आपल्या या बाबतीत आपल्या पतीच्याही पुढे चार पाऊल आहेत. अनेक गोष्टी तर नीलेश लंके यांच्यापर्यंत पोहोचेपर्यंत त्यांची तड लागलेली असते. आंदोलन असो की रॅली किंवा भव्य सभा, राणीताईंनी आपल्या नेतृत्वाची चुणूक वारंवार दाखवून दिलेली आहे. कोरोना काळात जेंव्हा सगळं काही ठप्प होतं तेंव्हा रुग्णांची सेवा करण्यासाठी निलेश लंके उभा राहिले. यावेळीही त्या आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्ष कोरोना सेंटरमध्ये काम करीत होत्या. रुग्णांसाठी जेवण तयार करीत होत्या. खासदारकीच्या निवडणूकीनंतर नीलेश लंके यांनी काढलेल्या मोर्चातही राणीताई आघाडीवर होत्या. मस्तवाल शासनाला कापरं फोडण्यासाठी त्यांनी महिलांच्या प्रचंड मोर्चाचे नेतृत्व केले. आंदोलनकर्त्यांसाठी रस्त्यावरच स्वयंपाकही केला. राणीताईंना प्रशासकीय कार्यपद्धतीची उत्तम जाण आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे शासनव्यवस्था गोरगरीबांसाठी राबवायची असते हे त्यांचे तत्व आहे. म्हणूनच त्या पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघासाठी नीलेश लंके यांच्या वारसदार ठरतात.

# कणखर राणीताई!

**पारनेर-नगर विधानसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरलेल्या राणीताई लंके या राजकारणाला नवख्या नाहीत. जिल्हा परिषद सदस्या म्हणून काम करण्याचा दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. याखेरीज त्यांचे पती खासदार नीलेश लंके यांच्या आमदारकीचा आणि खासदारकीचा संपूर्ण प्रचार त्यांना एकहाती केला आहे. महिलांसाठीच्या प्रचाराची धुरा सांभाळताना राणीताईंनी अतिशय कौशल्याने सुत्रे हालविली. नगरची लेक आणि पारनेरची सून हे समीकरण जनमाणसात रुजविण्यात त्या यशस्वी झाल्या असून पारनेर-नगर विधानसभेच्या आमदार म्हणून त्या निवडून जातील ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.**










# नगरची लेक; पारनेरच्या सुनेला मोठा जनाधार !

## राणी लंके होणार प्रथम महिला आमदार

**नगर तालुक्यातील अरणगांव येथील अण्णासाहेब व सरस्वती शिंदे यांची कन्या व पारनेर तालुक्यातील ज्ञानदेव व शकुंतला लंके यांची सुन तसेच खासदार नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके या विधानसभेचे सभागृह वाजविण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. राणी लंके यांच्या रूपाने ७४ वर्षानंतर प्रथमच मतदारसंघाला महिला आमदार लाभणार आहे.**


अरणागांवच्या अवतार मेहरबाबा विद्यालयात शिक्षण घेतलेल्या राणी लंके यांचा विवाह नीलेश लंके यांच्याशी झाला आणि त्यानंतरच्या काळात लंके परिवाराने राजकारणातील अनेक शिखरे पादाक्रांत केली. राणी लंके यांनी प्रथम पंचायत समितीची निवडणूक लढविली आणि त्यात यश संपादन केले. पंचायत समितीमध्ये सदस्य म्हणून काम करताना लंके यांनी समाजाच्या विविध घटकांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या कामाची दखल घेत त्यांना उपसभापतीपदावर काम करण्याची संधी पहिल्याच टर्ममध्ये देण्यात आली. उपसभापती म्हणून काम करताना त्यांनी गरजू महिलांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्या. गरीब कुटूंबातील मुला-मुलींसाठी सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करून त्यांनी सामुदायिक विवाह चळवळीस प्रोत्साहन दिले.

महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिलाई मशिनचे वाटप, बचत गटाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून महिला सक्षमीकरणावर त्यांनी भर दिलेला आहे.

पंचायत समितीमध्ये भरीव काम केल्यानंतर राणी लंके यांना सुपा जिल्हा परिषदेच्या गटातून शिवसेनेच्या वतीने उमेदवारी करण्याची संधी मिळाली. पंचायत समितीमध्ये केलेल्या कामाच्या जोरावर मतदारांनी त्यांना मोठया मताधिक्क्याने जिल्हा परिषदेत पाठविले. जिल्हा परिषदेतही राणी लंके यांनी आपल्या कामाची चुणूक दाखविली. पंचायत समितीतील पाच वर्षांचा कामाचा अनुभव त्यांना जिल्हा परिषदेचे कामकाज पाहताना आला. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या मतदारसंघातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात विकास कामे राबवून एक जिल्हा परिषद सदस्य किती परिणामकारक काम करू शकतो याचे उत्तम उदाहरण त्यांनी राजकारणात नव्याने पाउल टाकणाऱ्या तरूणाईपुढे ठेवला.

### जिल्हा नियोजनमध्ये प्रभाव

जिल्हा नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळावी यासाठी राणी लंके यांनी शिवसेनेच्या वरिष्ठांकडे मागणी केली होती. मात्र राजकीय कुरघोडीत त्यांना डावलेले गेले. पुढे जिल्हा परिषद सदस्यांच्या आग्रहाखातर राणी लंके यांनी या निवडणूकीत उतरण्याचा निर्णय घेतला आणि त्या जिल्हयात सर्वाधिक मतांनी विजयी झाल्या. जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्य म्हणून काम करताना लंके यांनी प्रभावी काम केले. या समितीच्या माध्यमातून लंके यांनी मतदारसंघात भरीव निधी खेचून आणला. तालुक्याच्या विकासाला चालना दिली.





### राजकीय आव्हानातही राणीताई खंबीर

शिवसेनेमध्ये मतभेद झाल्यानंतर खा. लंके यांना शिवसेनेच्या तालुकाप्रमुखपदावरून पायउतार व्हावे लागले. पुढे शिवसेनेतूनही त्यांना बाहेर पडावे लागले. पक्षातून बाहेर पडल्यानंतर निर्माण झालेले आव्हान पेलताना राणी लंके याही खंबीरपणे खा. लंके व त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत उभ्या होत्या. महिला आघाडीच्या सदस्यांना सोबत घेत राणी लंके यांनी नीलेश लंके प्रतिष्ठानच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले.



### जनसंवाद यात्रेतही राणी लंके अग्रभागी

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या स्थापनेनंतर सहकाऱ्यांशी विचार विनिमय केल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. निवडणूक लढविण्याचा निर्णय झाल्यानंतर मतदाराची भूमिका जाणून घेण्यासाठी तालुक्याच्या गावागावात जात जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून खा. लंके यांनी मतदारसंघाचा कानोसा घेतला. मतदारांचा यात्रेस अतिशय चांगला प्रतिसाद मिळत असताना या यात्रेमध्ये राणी लंके यांनीही अग्रभागी राहत महिलांच्या भावना जाणून घेतल्या होत्या.

### २०१९ च्या निवडणूकीतही योगदान

सन २०१९ च्या विधानसभा निवडणूकीपूर्वी कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवावी हा प्रश्न निर्माण झाल्यानंतर अनेकांच्या मागणीनुसार खा. लंके यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, अजित पवार यांची भेट घेत मतदारसंघातील त्यांच्या संघटनाची सविस्तर माहीती दिली. द्वियींनी मतदारसंघाचा कानोसा घेतला असता लंके यांना मोठा जनाधार असल्याचा अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर खा. लंके यांना राष्ट्रवादी कॉँग्रेसमध्ये प्रवेश देण्यात आला. प्रवेशाच्या सभेतच खा. लंके यांनी आपल्या संघटनाची चुणूक दाखवित विक्रमी उपस्थितीने राष्ट्रवादीच्या नेतेमंडळींवर प्रभाव पाडला. प्रत्यक्ष राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाकडून निवडणूकीच्या रिंगणात उतरल्यानंतर राणी लंके यांनी महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडून महिला आघाडीची धुरा समर्थपणे सांभाळली.

### लंके यांच्या आमदारकीनंतर राणी लंके यांची जबाबदारी वाढली

सन २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत खा. नीलेश लंके यांनी मोठे मताधिक्क्य घेत विजय संपादन केला. तालुक्याचे आमदार म्हणून काम करताना खा. लंके यांची जबाबदारी वाढली होती. खा. लंके यांच्या सदैव व्यस्त असलेल्या दिनक्रमाबाबत कधीही कुरबूर न करता राणी लंके यांनी मतदारसंघातील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणे, नागरीकांच्या सुख, दुःखात सहभागी होणे, सामाजिक, राजकीय भुमिका निभावणे ही कामे समर्थपणे केली. खा. लंके यांच्या खांद्याला खांदा लावून राजकारण समाजकारणात सक्रीय असलेल्या राणी लंके यांच्या गाठीशी असलेला अनुभव पाहता भविष्यात त्यांना मिळणारी मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधीची जबाबदारी त्या यशस्वीपणे पार पाडू शकतील यात शंका नाही.



### खासदारांची पत्नी म्हणून काय झाले ?

1 खा. नीलेश लंके हे विजयी झाल्यानंतर निवडणूकीतील प्रचारादरम्यान त्यांनी दुध व कांदा दराबाबत मोर्चा काढून शासनाचे लक्ष वेधण्याचे जाहिर केले होते.

2 जाहिर केल्याप्रमाणे खा. लंके यांनी दुध, कांदा उत्पादक शेतकरी तसेच जनावरांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला होता. या मोर्चाची जिल्हाधिकाऱ्यांकडून दखल न घेतल्याने खा. लंके यांनी तिथेच आमरण उपोषणास सुरूवात केली. उपस्थित आंदोलकांच्या भोजनाची व्यवस्थाही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर चुली मांडून करण्यात आली.

3 या भोजन व्यवस्थेमध्ये राणी लंके या आघाडीवर होत्या. स्वतः कालवण भाकरी करत त्यांनी आंदोलकांना भोजन दिले. आंदोलनात उपस्थित इतर महिला त्यांना स्वयंपाक करण्यापासून परावृत्त करू पाहत होत्या मात्र खासदाराची पत्नी असले म्हणून काय झाले, मीही तुमच्यासारखीच सर्वसामान्य आहे. जनतेची सेवा हाच आमचा पिंड आहे व त्यातच आम्हाला आनंद असल्याचे सांगत राणी लंके यांनी आपले सामाजिक दायित्व अधोरेखीत केले.

4 खासदार, आमदार हे मतदारसंघातील जनतेचे प्रतिनिधीत्व करतात. मतदारसंघातील जनतेच्या समस्या दुर करणे हे त्यांचे कर्तव्य असते. ही पदे मिरविण्यासाठी नसतात तर जनतेची सेवा करण्यासाठीच असतात अशी पुष्टीही यावेळी राणी लंके यांनी केली होती.



### खा. लंके यांना खंबीर साथ

खा. नीलेश लंके हे शिवसेनेचे तालुकाप्रमुख म्हणून काम पाहत असताना दुसरीकडे पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राणी लंके या देखील सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत होत्या. खा. लंके हे तालुकाप्रमुख पदाची जबादारी सांभाळत असताना त्यांचा दिनक्रम आजच्यासारखाच २४ तास ३६५ दिवस व्यस्त होता. त्यांच्या पश्चात सामाजिक, राजकीय जबाबदारी सांभाळत राणी लंके यांनी त्यांना खंबीर साथ दिली.

### कोरोना काळात सामाजिक बांधिलकी

खा. नीलेश लंके हे आमदार झाल्यानंतर काही महिन्यांतच जगात कोरोना महामारीने थैमान घातले. राज्यात लॉकडाऊन जाहिर करण्यात आले. सर्वत्र भितीचे वातावरण तयार झालेले असताना खा. लंके यांनी मात्र या संकटापुढे न डगमगता नागरीकांना मदत करण्याची भूमिका घेतली. घराबाहेर पडू नये अशी सक्त ताकिद असताना खा. लंके हे नेहमीच्या दिनक्रमाप्रमाणे सकाळीच घराबाहेर पडत. कोरोनाच्या विळख्यात आपला पती सापडण्याची भिती असतानाही राणी लंके यांनी खा. लंके यांच्याकडे एकदाही कुरबूर केली नाही. समाजसेवेचा पिंड असलेल्या खा. लंके यांना राणी लंके यांनी साथ दिली. पहिल्या लॉकडाऊनमध्ये परगावी, परराज्यात जाणाऱ्या वाटसरूंना निवारे, भोजन कक्ष सुरू करण्यात आले होते. त्याला हातभार लावण्यातही राणी लंके यांनी पुढाकार घेत आपली सामाजिक बांधिलकी निभावली.

### दुसऱ्या लाटेतही राणी यांची साथ

कोरोनाची दुसरी लाट भयंकर होती. शेकडोच्या संख्येने कोरोना बाधितांची संख्या वाढत असताना रूग्णांसाठी कोरोना सेंटर सुरू करण्याची जबाबदारी स्विकारणार कोण ? हा प्रश्न प्रशासनापुढे उभा होता. जिल्हयातील मोठे साखर कारखानदार, शिक्षण सम्राट पुढे येण्यास तयार नसताना वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी कटाऱ्यात असलेल्या खा. नीलेश लंके हे मात्र स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी तातडीने मतदारसंघात येत १ हजार १०० रूग्णांचे शरदचंद्र पवार आरोग्य मंदिर सुरू करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. अनेक कोरोना बाधित रूग्ण दगावत असताना खा. लंके हे कोरोना बाधितांमध्ये जाऊन त्यांची सेवा करत होते. स्वतःच्या जीव धोक्यात घालून लंके हे बाधितांची सेवा करत असताना राणी लंके यांनी मात्र खा. लंके यांच्या खांद्याला खांदा लावून कोरोना बाधितांची सेवा केली.



### राणी लंके यांची स्वतंत्र ओळख

राणी लंके या खा. नीलेश लंके यांच्या पत्नी असल्या तरी समाजकारण, राजकारणात त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषदेत काम करण्याच्या दहा वर्षांच्या अनुभवाच्या जोरावर त्या प्रशासन उत्तमपणे हाताळू शकतात. विविध सामाजिक उपक्रमांमध्येही गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचा सहभाग आहे. स्वतःच्या कामातून, कर्तुत्वातून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून फक्त नीलेश लंके यांच्या पत्नी म्हणून त्यांना उमेदवार देण्यात आली असून त्यांचा प्रशासकीय अनुभव, जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये केलेल्या कामाचा अनुभवाच्या जोरावर त्या या निवडणूकीला सामोऱ्या जात आहेत.

### नगरकरांना कौतुक

नगर तालुक्याची लेक विधिमंडळात जाणार असल्याने नगरकरांना राणी लंके यांचे कौतुक वाटते. राणी लंके यांना नगर तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्क्य मिळावे यासाठी गावागावांतील कार्यकर्ते, पदाधिकारी मतदारांशी संवाद साधत असून नगरची लेक म्हणून मतदारांकडूनही राणी लंके यांना मोठे पाठबळ मिळत आहे. राणी लंके यांचे माहेर नगर तालुक्यातील अरणगांव येथील असल्याने त्यांच्यावर बाहेरच्या उमेदवार म्हणून करण्यात येणाऱ्या टीकेला मतदार मात्र प्रतिसाद देत नाहीत. ही आमची लेक आहे, तीला आम्ही मोठया मताधिक्क्याने विधिमंडळात पाठविण्याचा निर्धार नगरकरांनी केला आहे.



# ग्रामीण विकासासाठी आश्वासक चेहरा : राणीताई लंके

**जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीच्या उपसभापती अश्या विविध पदांवर गेले दशकभर काम करणाऱ्या राणीताई नीलेश लंके यांच्याकडे पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी एक आश्वासक चेहरा म्हणून पाहिले जात आहे.**

**संजय वाघमारे**

ग्रामीण भागात जन्मलेल्या आणि ग्रामीण भाग हेच कार्यक्षेत्र आणि कर्मभूमी असलेल्या राणीताईंना ग्रामीण समस्यांची नेमकी जाण आहे. ग्रामीण विकासाशी संबंधित विविध पदांवर काम करताना राणीताईंनी केलेले काम सर्वज्ञात आहेच.त्याचबरोबर त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कामालाही तोड नाही. जिल्हा नियोजन मंडळ, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या विविध नाविन्यपूर्ण योजना राबवणाऱ्या राणीताईंनी पारनेर तालुक्याच्या विकासासाठी भरीव योगदान दिले आहे.

पंचायत राज व्यवस्थेतील कामाचा दीर्घ अनुभव पाठीशी असलेल्या राणीताईंनी सहा महिन्यांपूर्वी नगर जिल्ह्याच्या दक्षिण भाग शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने पिंजून काढला. या यात्रेदरम्यान गावोगावच्या समस्या समजून घेतल्या.या समस्या सोडवण्यासाठी कालबद्ध आराखडाही तयार केला. पुढील पंचवीस तीस वर्षांच्या पायाभूत सुविधांचा विचार करून ग्रामीण विकासाचा एक पक्का आराखडा तयार करण्याची दूरदृष्टी असलेल्या राणीताई लंके यांचे नाव विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार गट) चर्चेत आहे.राणीताई याच राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार असतील असा आत्मविश्वास राणीताईंचे कार्यकर्ते आणि नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्यांना आहे.त्यांच्या विधानसभा निवडणुकीतील विजयाची खात्री केवळ त्यांचे समर्थक कार्यकर्तेच नव्हे तर सर्वसामान्य मतदारही निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच देत आहेत.ही त्यांनी झोकून देऊन केलेल्या कामाची पावतीच आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठिमागे एक स्त्री असते ही संकल्पना आता मागे पडली असल्याचे राणीताईंचे काम पाहून अधोरेखित होत आहे.

खरा यशस्वी पुरुष तोच ज्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या मंडळीत त्यांच्या अर्धांगिनीचा देखील सिंहाचा वाटा असतो.खासदार नीलेश लंके यांना ते भाग्य लाभले आहे. आमदार खासदाराचे घर म्हणजे जुने असल्यास चौसोपी वाडा,नवीन असल्यास भव्य बंगला अथवा बहुमजली इमारत,भला थोरला हॉल, बैठक व्यवस्था, उंची साहित्य, परदेशातून आणलेल्या उंची शोभेच्या वस्तू आणि क्षणा-क्षणाला समोर येऊन उभे राहणाऱ्या नोकर चाकरांची लगबग असे एक सर्वसामान्य माणसाच्या मनात आधीच तयार झालेले चित्र ! भेटीसाठी आलेल्या अभ्यंगतांना तासाभर ताटकळत ठेवल्यानंतर पांढऱ्याशुभ्र उंची कपड्यात आणि अत्तराच्या घमघमाटात साहेबांची एन्ट्री! मग बघून न बघितल्यासारखे करत ऐटीत साहेब त्यांच्या अँटी चेंबर मध्ये जाऊन बसणार आणि आधीच नावे नोंदवून घेतलेल्यांना स्वीय्य सहायकाने साहेबांच्या भेटीसाठी एक एक करत आत सोडायचे. अभ्यंगतांनी आपला नंबर कधी येतोय म्हणत आपण वाट पहायची. हे सरधोपट चित्र. पण या चित्राला पूर्ण ३६० अंशाच्या कोनात फिरवून नीलेश लंके यांनी भेटायला येणारा प्रत्येक नागरिक हा सेलिब्रिटी असून आपण त्याचे सेवक आहोत. त्याच्यासाठी आपली नेमणूक झाली आहे आणि आपण त्याचे काम केलेच पाहिजे ही भावना निर्माण केली आहे. रात्री झोपताना घातलेल्या टी शर्ट आणि बर्म्युडावर बाहेर येऊन हा माणूस लोकांशी संवाद साधतो. त्यांच्या समस्या जाणून घेतो. तेव्हाच त्यांचा दिवस सुरू होतो.

खासदार लंके यांच्या हंगे येथील निवासस्थानी पहिल्यांदाच गेलेले नेते, कार्यकर्ते त्यांचे अत्यंत साधे आणि छोटेखानी घर पाहून अचंबित होतात.एका आमदाराचे,खासदाराचे हे घर आहे याच्यावर विश्वास बसणे कठीण होते.ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अनेक दिग्गज राजकारण्यांनी खासदार लंके यांच्या घराला आणि घराईतक्याच साध्या लंके कुटुंबाला भेट दिली आहे.शरद पवार नेहमीच आपल्या भाषणात खासदार लंके यांच्या साध्या घराचा, त्यांच्या, त्यांच्या कुटुंबाच्या साध्या राहणीमानाचा कौतुकाने आवर्जून उल्लेख करतात.

खासदार लंके यांच्या अगदी छोटेखानी आणि जुन्या काळातील घरात, चेहऱ्यात बऱ्यापैकी साम्य असलेल्या दोन गृहिणी काम करताना दिसतात. एखादी भांडी घासत असेल. तर दुसरी कपडे धुवून वाळत घालत असेल किंवा सुकलेले कपडे गोळा करत असेल. ही दोन्ही कामे संपली असतील, तर अन्य काही घरकाम करत घरी आलेल्या कोणातरी पाहुण्यांचा पाहुणचार करताना दिसतील आणि ज्या दोघी तिथे काम करत असतील त्या दोघी सख्या बहिणी आहेत.त्यांपैकी एक खुद्द निलेश लंके यांच्या सौभाग्यवती राणीताई आहेत. लंके यांच्या सौभाग्यवती इतकीच त्यांची ओळख नाही तर त्या जिल्हा परिषद सदस्य होत्या.नगर जिल्ह्यातील अनेक दिग्गजांना नमवून त्या जिल्हा नियोजन मंडळावर निवडून गेल्या होत्या. आणि राजकीयदृष्ट्या जागृत असलेल्या पारनेर तालुका पंचायत समितीचे उपसभापतीपद भूषवताना त्यांनी आपल्या कामाचा ठसाही उमटला होता ही त्यांची ओळख अपररिचितांना अचंबित करणारी असते.

एका खासदाराची सौभाग्यवती, विविध पदे भूषविलेल्या राणीताई जरासाही अभिमान किंवा अहंकार, न बाळगता घरची झाडलोट, भांडीकुंडी आणि कपडे धुणे आदी कामे करत असतात.घरकाम करण्यासाठी नोकरचाकर असणे, हे या कुटूंबाच्या गावीही नाही. अत्यंत शांत संयमी आणि सोज्वळ असलेल्या राणीताई अगदी हसतमुखाने आल्या गेलेल्यांचे स्वागत करतात.हातातली कामे संपवून तातडीने चहा नाष्ट्याचे बघतात. त्यांच्याशी दोन पाच मिनिटे बोलाव म्हटलं, तरी त्यांना वेळ नसतो. आपल्या आधी जे पाहुणे येऊन गेले. त्यांनी केलेल्या नाष्ट्याच्या प्लेट्स आणि चहाचे कप विसळून घेऊन नव्या पाहुण्यासाठी त्यांना तयारी करायची असते. अगदीच काही झालं तरी त्यांच्याशी बोलायचंच, असं ठरवून गेलात तर मात्र हातातले काम मध्येच सोडून तशाच पदराला हात पुसत त्या पाहुण्यांना समोरे जातात. जाता जाता जेवण करूनच जा, असा आग्रह करायला मात्र विसरत नाहीत. इतक्या त्या साध्या सरळ मनाच्या, निर्मळ आणि आपलेपण जपणाऱ्या आहेत. तिथेच खाटेवर कोपऱ्यात अभ्यास करत बसलेली कन्या पाहुणे घरी येताच वह्या पुस्तकं गुंडाळून ठेवत आई आणि काकूंच्या मदतीला जाते. दोन्ही मुलंही तशीच. आनंद आणि समाधान जणू या कुटुंबाची दैवी देणच आहे. प्रत्येकाशी हसतमुखाने बोलणे, उत्साहाने आणि अजिजीने स्वागत करणे, आग्रह करून करून त्या त्या वेळेनुसार चहा नाष्टा किंवा जेवण करण्याविषयी विचारणे, ही आपुलकी प्रत्येकाच्या वागण्या बोलण्यातून अगदी स्वच्छ जाणवत राहते. नव्हे प्रत्यक्ष अनुभवायलाच मिळते. त्यासाठी या कुटुंबाचा आपलेपणा अनुभवायला किमान एकदा तरी त्यांच्या घरी जावेच, असे हे कुटुंब आहे.

पाहुणचार घेऊन आपण जेव्हा निघू तेव्हा आवर्जून सर्वजण बाहेर पर्यंत सोडायला येतात. खुद्द गुरुजी आणि आक्का 'पुन्हा या बरका. आणि पुढच्या वेळी असं घाई घाई येऊ नका. निवांत जेवायलाच या', असे सांगत अगदी आपल्या गाडीपर्यंत सोडायला येतात, तेव्हा खरे पटते, की नीलेश लंके यांची समाजाप्रति असलेली ओढ, ही त्यांच्या आई वडिलांचे संस्कार पुण्याई आणि अर्धांगिनीची समर्थ साथ आहे.हंगे गावचे सरपंचपद ते दिल्लीचे संसद भवन या प्रवासात राणी ताईंनी निलेश लंकेंना समर्थ साथ दिली आहे.



### पतीसोबत संघर्षाला तयार असल्याचे सिद्ध केले

कांदा व दूध उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केलेल्या निर्णायक आंदोलनात राणीताई देखील हिरिरीने सहभागी झाल्या. महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन त्यांनी ट्रॅक्टर मोर्चात सहभाग घेतला. रस्त्यावर उतरलेल्या कार्यकर्ते मंडळींसाठी भाकरी थापून पिठलंही हाटलं. आपल्या या कृतीतून त्यांनी आपणही पतीसोबत कोणत्याही संघर्षाला तयार असल्याचं दाखवून दिले आहे.



# मुंबईतील 'पारनेर'मध्ये तुतारीचा 'निनाद'!

। आमचे मत राणीताई लंके यांनाच
। मुंबईमधील पारनेर नगरकरांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया
। २० नोव्हेंबरला स्वयंस्फूर्तीने गावी जाण्याचा निर्धार

**पनवेल/नाना करंजुले**

नोकरी व्यवसायानिमित्त मुंबई परिसरात स्थायिक झालेले परंतु मूळ गावी मतदान असलेल्या पारनेर नगरकरांनी पुन्हा एकदा संकल्प केला आहे. मुंबईतील पारनेर मध्ये खऱ्या अर्थाने तुतारीचा निनाद घुमू लागला आहे. आमचे मत राणीताई लंके यांनाच २० नोव्हेंबरला गावी येऊन मतदान करून त्यांना विधानसभेत पाठवणार म्हणजे पाठवणारच अशा प्रकारचा निर्धार मुंबईकरांनी केला आहे.

पारनेर नगर तालुक्यातील हजारो कुटुंब नोकरी व्यवसाय निमित्त मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरामध्ये स्थायिक झाले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने वाहतूकदार, मासळी उद्योग, सी एच ए आणि इतर सरकारी तसेच खाजगी नोकरी आणि व्यवसायाचा त्यामध्ये समावेश आहे. विशेष करून पठार भाग आणि निघोज पट्ट्यातील मूळ रहिवाशांची संख्या ही सर्वाधिक आहे. कामोठे वसाहतीला तर मिनी पारनेरचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या ठिकाणी जवळपास अडीच हजार कुटुंब वास्तव्यास आहेत. परिणामी खासदार निलेश लंके यांनी २०१९ ला विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा कामोठे येथूनच केली होती. त्याचबरोबर फेब्रुवारी महिन्यामध्ये लोकसभेचे रणसिंग याच वसाहतीमधून फुंकले होते. कामोठे आणि निलेश लंके यांचे वेगळे नाते आहे. निलेश लंके प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने नवी मुंबई रायगड परिसरातील सर्वाधिक रकमेची दहीहंडी याच ठिकाणी लावण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य राणीताई लंके यांना प्रोजेक्ट करण्यात आले. हजारो बॅनर्स, कमानी उभारून विधानसभेचे निवडणूक राणीताई लंके लढवणार अशा प्रकारचे संकेत देण्यात आले होते. दरम्यान गेल्या काही महिन्यांपासून मुंबई प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी स्वयंसेवक आणि कार्यकर्ते निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. मुंबई, पनवेल, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, बोईसर, अंबरनाथ, बदलापूर या परिसरामध्ये वास्तव्यास असणाऱ्या पारनेर नगरकरांचा पूर्णपणे डाटा तयार करण्यात आला आहे. खासदार निलेश लंके यांना मानणारा हा वर्ग आहे. या मतदारसंघातील जवळपास १४ हजाराहून अधिक मतदार हे मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरात राहतात. मागील विधानसभा आणि काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत सुद्धा त्यांनी आपल्या मूळ गावी जाऊन मतदान केले. यावेळी सुद्धा हजारो मुंबईकर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी उत्सुक आहेत. दरम्यान निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून या सर्वांशी संपर्क सुरू असताना आम्ही नीलेश लंके यांनाच मानणारे आहोत. नेते अनेकदा आमच्या घरी आलेले आहेत. त्याचबरोबर ते आम्हाला वैयक्तिक रित्या ओळखतात. त्यामुळे मतदानासाठी आम्ही नक्कीच गावी येणार आहोत. आणि आमचे मत हे राणीताई लंके यांनाच असेल अशा उत्स्फूर्त प्रतिक्रिया मुंबई स्थित पारनेर नगरकरांकडून मिळत आहेत.

### मुंबईच्या मतदारांमुळे राणीताई प्लस!

मुंबईमध्ये हजारोच्या संख्येने पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील मतदार आहेत. यांच्याशी खासदार नीलेश लंके यांचे वैयक्तिक संबंध आहेत. सर्वांच्या सुखदुःखामध्ये ते सातत्याने सामील होतात. मुंबईतील पारनेरकर हे माझे कुटुंब आहे या भावनेतून एक जिव्हाळ्याचे नाते खा. लंके यांनी निर्माण केले आहे. त्यामुळे येथील मतदार आपल्या मूळ गावी जाऊन मतदान करणार आहे. आणि हेच मतदान राणीताई साठी प्लस पॉईंट असणार असल्याची प्रतिक्रिया प्रतिष्ठानचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेशशेठ ढवन यांनी दिली.

### कामोठेत प्रतिष्ठानची वॉर रूम!

कामोठे वसाहतीत निलेश लंके प्रतिष्ठान मुंबईने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वॉर रूम सुरू केली आहे.अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मुंबई स्थित पारनेर नगरकरांची संवाद साधला जात आहे. त्याचबरोबर संपूर्ण मतदार यादीनुसार मतदानासाठी आपल्या मूळ गावी जाण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे. अडीचशे ते पावणे तीनशे किलोमीटर दूरवरून पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील प्रचार यंत्रणा अतिशय सूक्ष्म आणि नियोजनबद्ध रित्या राबवली जात असून हा विषय कुतूहालाचा बनत चालला आहे. त्याचबरोबर खासदार निलेश लंके उमेदवार राणी लंके यांच्या यंत्रणेची जोरदार चर्चा सुरू आहे.

### अनेक मुंबईकर प्रचारासाठी मूळ गावी!

निलेश लंके प्रतिष्ठान मुंबईमध्ये हजारो कार्यकर्ते सक्रिय आहेत. या ठिकाणी वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने वर्धापन दिन मेळावा, हळदी कुंकू समारंभ तसेच दहीहंडी उत्सव भरवला जातो. प्रतिष्ठानच्या माध्यमातून पारनेर नगरकरांना अडचणीमध्ये मदत केली जाते. दरम्यान निलेश लंके यांना मानणारे अनेक मुंबईकर राणीताई लंके यांच्या प्रचारार्थ आपल्या मूळ गावी गेले आहेत.



निलेश लंके प्रतिष्ठान मुंबई ही संघटना अत्यंत सक्रिय आणि बांधिलकी जपून गेल्या सहा वर्षांपासून काम करत आहे. मुंबईतील पारनेरकरांना खासदार नीलेश लंके यांनी आपले स्वतःचे कुटुंब मानले आहे. जिव्हाळा आणि प्रेमाचे ऋणानुबंध निर्माण झालेले आहेत. राजकारण आणि निवडणुकीच्या पलीकडचे हे संबंध आहेत. परिणामी लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही मुंबईकरांनी मूळ गावी जाऊन राणीताई लंके यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा 'पण' केला आहे. आणि हे सर्वजण उत्स्फूर्तपणे मतदानाला उतरणार आहेत.

- **सुरेश धुरपते,** अध्यक्ष, निलेश लंके प्रतिष्ठान मुंबई




'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ • Mob : 9421478283 • Email : deviabuj@gmail.com